अस्सल सोलापुरी

सुराज्य
सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि.१३ फेब्रुवारी २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १३६ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८



अखेर गच्छंती...

कोश्यारींना घरचा रस्ता दाखवला, आघाडीच्या नेत्यांनी सुस्कारा टाकला

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे हे पदावर असताना महाविकास आघाडीच्या सरकारला ज्यांनी अतोनात छळले, भाजपाचे ज्येष्ठ नेते तथा त्यावेळचे विरोधी पक्षनेते (आताचे उपमुख्यमंत्री) देवेंद्र फडणवीस यांच्या तालावर नाचणारे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची रविवारी अखेर उचलबांगडी झाली. राष्ट्रपती भवनातून झालेल्या या निर्णयाचे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी स्वागत केले आहे.

कोश्यारींना घरचा रस्ता दाखवण्याचा निर्णय योग्य आहे पण इतका विलंब का लावला? असा प्रश्न आघाडीच्या नेत्यांनी उपस्थित केला आहे. कोश्यारी यांनी घटनात्मक पदाची शान बासनात गुंडाळून ठेवत आघाडीच्या नेत्यांना जाणीवपूर्वक त्रास देणे, वादग्रस्त विधाने करून खळबळ माजवण्याचा प्रचंड धुमाकूळ घातला. महाराष्ट्राच्या सदैव स्मरणात राहतील,अशा कोश्यारींचा ३ वर्षे ५ महिने व १२ दिवसांचा प्रवार अखेर थांबला. नवे राज्यपाल म्हणून रमेश बैस यांनी नियुक्ती करण्यात आली आहे.

राज्यातील सत्तासंघर्ष निर्णायक टप्प्यावर आलेला असताना कोश्यारींना राज्यभरातून विरोध झाला होता. त्यानंतर कोश्यारी यांनी पदमुक्त होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे इच्छा व्यक्त केली होती. कोश्यारी यांनी राज्यातील राजकारण तापण्यापर्यंत वेळोवेळी अनेक वादग्रस्त वक्तव्ये केली होती. राज्यात त्यांच्याबद्दल महाविकास आघाडी आणि सर्वसामान्य लोकांमध्ये संताप होता. त्यांच्या राजीनाम्याची सातत्याने मागणी होत होती. अनेक ठिकाणी विरोधकांनी आंदोलन आणि मोर्चे देखील काढले होते. विरोधकांनी जोडेमार आंदोलनही केले. या तापलेल्या वातावरणात भाजपची गोची झाली. इतके रान पेटलेले असतानाही कोश्यारींना का हाकलले जात नाही,असा सवाल जाणकारांमधून भाजप नेत्यांना विचारला जात होता.

वाढता विरोध पाहाता कारवाई होण्यापूर्वीच काही दिवसांपूर्वी कोश्यारींनी स्वतः राजकीय जबाबदारीतून मुक्त करा, अशी इच्छा पंतप्रधानांना कळवल्याचे राज्यपाल कार्यालयाकडून सांगण्यात आले होते. यानंतर आता काय होणार याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून होते. राज्यपाल बदलणार हे नक्की होते, कारण कोश्यारींच्या वक्तव्यांनी भाजपला गेल्या काही महिन्यात राज्यांत फटका बसत होता. त्यामुळे कोश्यारींना हटवल्यानंतर भाजपच्या नेत्यांनी सौम्य प्रतिक्रिया दिल्या आहेत. राज्यपालपदाची सूत्रे हातात घेतल्यानंतर थोड्याच दिवसात राज्यात निवडणुका झाल्या. त्यानंतर सत्तास्थापनेचे मोठे नाट्यही घडले. कोश्यारींनी फडणवीस आणि अजित पवारांना राजभवनात भल्या पहाटे अचानक शपथ दिल्यानंतर त्यांच्यावर भाजपची बाजू घेत असल्याचा आरोप झाला. त्यानंतर कोरोनाची साथ आल्यानंतरही भाजपचे नेते वारंवार राज्यपालांकडे जाऊन भेटी घेत होते. त्यामुळे आघाडीच्या नेत्यांनी नाराजी व्यक्त केली होती.

...तर त्यांना ठोकणार

कोश्यारी यांचा राजीनामा मंजूर झाल्यानंतर स्वराज्य संघनटेचे संस्थापक संभाजीराजे छत्रपती यांनी समाधान व्यक्त केले आहे. कोश्यारी यांना हे उशिराने सुचलेले शहाणपण आहे, अशी टीकादेखील त्यांनी केली. दरम्यान नव्या राज्यपालांनी अगोदरच्या ज्या चुका केल्या आहेत, त्या लक्षात ठेवाव्यात, असा सल्ला त्यांनी नवनियुक्त राज्यपालांना दिला आहे. तसेच आगामी काळात महापुरुषांची बदनामी करण्याचा कोणी प्रयत्न केला तर त्यांना ठोकून काढणार, असा इशाराच संभाजीराजे छत्रपती यांनी दिला आहे. ते रविवारी माध्यम प्रतिनिधींशी बोलत होते.कोश्यारी यांनी महाराष्ट्राच्या सुसंस्कृतपणाची घडी मोडून काढली,अशा शब्दात त्यांनी संताप व्यक्त केला.

कसे ठरले वादग्रस्त...

- उद्धव ठाकरेंची आमदार म्हणून नेमणूक करायला कोश्यारींनी विरोध केल्यानंतर शिवसेनेने त्यांच्याबद्दल नाराजी व्यक्त केली होती. अखेर पंतप्रधान मोदींनी सांगितल्यानंतर कोश्यारी नमले. ठाकरेंचा आमदार व्हायचा मार्ग मोकळा झाला.
- विद्यापीठाच्या परीक्षांच्या मुद्द्यावरुनही आघाडी सरकारच्या विरोधात कोश्यारींनी भूमिका घेतली. त्यावेळी संघर्ष टाळून राज्य सरकारने कुलपती असलेल्या राज्यपालांचे म्हणणे मान्य केले. त्यावेळी शिवसेना नेते संजय राऊत यांनी कोश्यारींना केलेल्या नमस्काराचा फोटो राजभवनने जारी केला आणि त्यावर सोशल मीडियात एकच चर्चा सुरू झाली.
- गुजराती-राजस्थानी माणसाला मुंबईतून बाहेर काढलं तर मुंबईत पैसा उरणार नाही असं वादग्रस्त वक्तव्य कोश्यारींनी केले होते.
- समर्थ रामदास यांच्याविना शिवाजी महाराजांना कोण विचारेल? महात्मा फुले आणि सावित्रीबाई,नेहरूंच्या 'शांतीदूत' प्रतिमेमुळे भारत कमकुवत, छत्रपती शिवाजी महाराज तर जुन्या काळातले आदर्श आहेत, अशी एक ना अनेक वादग्रस्त विधान.
- आघाडी काळातील राज्यपाल नियुक्त आमदारांची यादी मंजुर न केल्याने राज्यापालांविषयी संताप

ट्रकची ऊस ट्रॉलीला धडक

✔ **सोलापूर** : पोफळी तालुका मोहोळ येथून मल्हारी वसंत बेजगर हेट्रॉली ट्रैक्टरमध्ये ऊस भरुन येवून सिध्देश्वर साखर कारखाना येथे जात असताना पाठीमागून आलेल्या ट्रक क्र.के.ए ५६- १९९९ च्या चालक किरण वेंकट गायकवाड (रा.गुत्ती बसवकल्याण बिदर) याने निष्काळजीपणाने व भरधाव वेगाने ट्रॅक्टरच्या पाठीमागील ट्रॉलीला जोराची धडक दिल्याने ट्रॅक्टर ट्रॉलीसह पलटी झाली. दोन्ही ट्रॉलीमधील ऊस रस्त्यावर पसरलेला होता.त्यानंतर लोकांची गर्दी जमली त्यातील काही लोकांनी तीन टन ऊस चोरून नेला.या धडकेत ट्रॅक्टरचे इंजीनचा ब्रेक रॉड,हंडी,दोन्ही ट्रॉली,ट्रॉली एक्सल,ड्रम तुटुन फुटुन तसेच ट्रॉलीची ऐसी बेन्ड होवून अंदाजे दीड लाख रुपयाचे नुकसान झाले आहे.अशी फिर्याद मल्हारी वसंत येजगर (वय-३८,पोफळी, ता.मोहोळ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल युगे हे करीत आहेत.

बॅनर लावण्याच्या कारणावरुन दोन गटात हाणामारी

✔ सुराज्य/सोलापूर

बॅनर लावण्याच्या कारणावरून बेकायदेशीर जमाव जमवून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना हत्यारे दाखवून दहशत निर्माण केल्याप्रकरणी १४ जणांच्या विरोधात फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची हकीकत अशी की, शनिवारी रात्री न्यू लक्ष्मी चाळ रिलायन्स मार्केट समोर आदित्य शैलेन्द्र माने,(रा.थोबडे मळा,देगाव नाका,सोलापूर),समर्थ प्रविण कांबळे,(रा.हौसे वस्ती,आमराई),संतोष आनंद कांबळे,(रा. क्रांती नगर,आमराई),शामराव गिरजाप्पा खाडेकर,(रा. गवळी वस्ती),मधुकर मनोज कांबळे (रा.हौसे वस्ती, आमराई),आदित्य शिवाजी भोसले (रा.गड दर्शन,दमाणी नगर),विजय विष्णु कांबळे,अक्षय साबळे, धनंजय चव्हाण, कुनाल गायकवाड,शैलेश गायकवाड,ओंकार हांडे,स्वप्निल बचुटे,शाम निकम,यांनी बॅनर लावण्याच्या कारणावरुन बेकायदेशीर जमाव जमवून सार्वजनिक रस्त्याने जाणाऱ्या व्यक्तींना तसेच वाहन धारकांना हातातील काठ्या,तलवार व कोयते दाखवून दहशत निर्माण करून त्यांचे हातातील लाकडी दांडक्याने मोटार सायकल क्रं.एम.एच.१३ डी.आर २५५२ फोडुन नुकसान करुन काठ्यांनी एकमेकांना मारहाण केली आहे.तसेच तेथील सार्वजनिक शांतता भंग केली आहे.अशा आशयाची फिर्याद कृष्णात बडूरे यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली आहे त्यांच्या फिर्यादीवरून फौजदार चावडी पोलीस ठाण्यात १४ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला.अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड हे करत आहे.

बनावट शपथपत्राच्या आधारे जमीन लाटली; गुन्हा दाखल

✔ सुराज्य/सांगोला

सांगली जिल्ह्यातील मिरज येथील राहुल कुमार सुगानावर याने बनावट शपथपत्राच्या आधारावर फसवणूक करून सांगोला तालुक्यातील काळू बाळू वाडी येथील कोट्यवधी रकमेची जमीन स्वतःच्या तसेच आई व बहिणीच्या नावावर करून दुसऱ्यास विक्री करीत असताना आढळून आल्याने याबाबत मिरजेतील डॉ. सचिन कुमार सुगानावर यांनी सांगोला पोलीस स्टेशनमध्ये राहुल, तलाठी, मंडल अधिकारीसह इतर दहा लोकांवर सांगोला स्टेशन मध्ये फिर्याद दाखल केल्याने खळबळ उडाली आहे.

सांगोला तालुक्यातील काळू बाळू वाडी हे गाव सोलापूर सांगली जिल्ह्याच्या सीमेवर सोलापूर कोल्हापूर या राष्ट्रीय महामार्गावर आहे या गावातील जमीन डॉक्टर सचिन कुमार सुगानावर यांचे वडील सुकुमार सुगानावर यांनी १९९४ मध्ये काळू बाळू वाडी येथील पांडुरंग आर्वी व दगडू कांबळे व इतर कांबळे बंधू कडून जमीन कायम खूश खरेदी खत करून विकत घेतली होती. भोगवटदार म्हणून सुकुमार सुगवणार अशी नोंद आहे. वडील सुकुमार हे २१ नोव्हेंबर २०१९ रोजी तर आई मंगल ही ११ ऑक्टोबर २०१९ रोजी मयत झाली. परंतु त्यापूर्वी मुलगा डॉक्टर सचिन याने आई वडील कडून २९ जुलै २०१५ रोजी मृत्युपत्र करून घेतले होते व जमीन संपत्ती सचिनच्या नावावर आलेली आहे. डॉ. सचिनचे वडील सुकुमार यांचा मृत्यू २१ नोव्हेंबर २०१९ रोजी झाला आहे. राहुल कुमार सुगनावर याने त्याचे वडील कुमार यांचे या नावे काळूबाळू वाडी येथे गट नंबर १८० व ८१ मध्ये शेतजमीन असून ती वारसा हक्काने स्वतःच्या तसेच आई व दोन बहिणीच्या नावे फोन करून स्वतःचा व कुटुंबाचा फायदा होईल या उद्देशाने दोन खोटी प्रतिज्ञापत्रे नोंदवण्यासाठी देण्यात आली. ती तलाठी व मंडल अधिकारी यांनी कोणतेही कागदपत्राची तपासणी न करता नोंद धरली.

याबाबत चौकशी केली असता तलाठी, मंडळ अधिकारी असे सांगतात की डॉक्टर सचिनच्या वडिलांचे नाव सुकुमार तर आरोपी राहुलच्या वडिलांचे नाव कुमार असे आहे. दोन्ही नावात साधर्म्य दिसून आल्याने नोंद करण्यात आल्याचे तलाठी यांनी सांगितले. सुकुमार व कुमार हे एकच नाव असून सु तेवढे हे झालेले आहे. जमिनीवर बेदाण्याचे पाच शेडसह सात लाख रुपये किमतीचे साहित्याचे विक्री झालेली दिसून येत आहे. या कामी राहुल कुमार सुगानावर आई शोभा, दोघेही मिरज येतील, बहीण अश्विनी देवमारे इचलकरंजी, बहीण स्नेहा निटवे पुणे, तलाठी साईनाथ रामोड काळू बाळू वाडी सांगोला, मंडल अधिकारी गजानन वानखडे यांच्यासह इतर सात जणांवर संगनमताने फसवणूक केली म्हणून गुन्हा नंबर १२७/२०२३ भादवि कलम ४२०, ३७९, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महिला विश्वचषकात भारताची विजयी सुरुवात

पाकिस्तानचा सात विकेट्सनी पराभव

✔ **नवी दिल्ली** : भारतीय महिला संघाने पाकिस्तानचा सात विकेट्सनी पराभव करत टी २० विश्वचषकात विजयी सुरुवात केली. पाकिस्तानने दिलेले १५० धावांचे आव्हान भारतीय संघाने एक षटक आणि सात विकेट्स राखून आरामात पार केले. जेमिमा रॉड्रिग्ज हिने अर्धशतकी खेळी करत पाकिस्तानच्या तोंडून विजयाचा घास हिरावला. ऋचा घोष हिने ३१ धावांची खेळी करत चांगली साथ दिली. पाकिस्तानकडून नशरा संधू हिने सर्वाधिक दोन विकेट घेतल्या. पाकिस्तानच्या कर्मधाराची ६८ धावांची खेळी व्यर्थ केली. जेमिमा रॉड्रिग्ज हिला सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.

पाकिस्तानने दिलेलं १५० धावांचं आव्हानाचा पाठलाग करताना शफाली वर्मा आणि यस्तिका भाटिया यांनी आक्रमक सुरुवात करुन दिली. पण ३८ धावांवर यस्तिका भाटिया हिच्या रुपाने भारताला पहिला धक्का बसला. यस्तिका हिने १७ धावांची खेळी केली. त्यानंतर जेमिमा आणि शफाली वर्मा यांनी भारताचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. पण संधूने शफालीला बाद करत भारताला दुसरा धक्का दिला. शफाली वर्मा ३३ धावांवर बाद झाली. त्यनंतर जेमिमा हिने कर्णधार हरमनप्रीत कौरसोबत भागिदारी करत विजयाकडे आगेकूच केली होती. पण पुन्हा एकदा संधू हिने विकेट घेत भारताला धक्का दिला. हरमनप्रीत कौर १६ धावा काढून तंबूत परतली. हरमनप्रीत बाद झाल्यानंतर भारतीय संघाच्या अडचणी वाढल्या होत्या. पण जेमिमा आणि ऋचा घोष यांनी संयमी अन् तितकीच आक्रमक फलंदाजी केली. अखेरच्या चार षटकात ४१ धावांची गरज होती. त्यावेळी दोघींनी वादळी खेळी केली. दोघांनी अवघ्या तीन षटकात ४१ धावांचा पाऊस पाडला.

पोलीस महासंचालकपदी रश्मी शुक्ला यांची बढती

✔ **नवी दिल्ली** : फोन टॅपिंग प्रकरणी वादाच्या भोवऱ्यात अडकलेल्या आयपीएस अधिकारी रश्मी शुक्ला यांना पोलीस महासंचालकपदी बढती देण्यात आली आहे. कॅबिनेट नियुक्ती समितीने(एसीसी) सन १९८८ व १९९९ बॅचच्या देशभरातील २० अधिकाऱ्यांना बढती दिली आहे. त्यात शुक्ला यांच्यासह अतुलचंद्र कुलकर्णी व सदानंद दाते यांनाही पोलीस महासंचालकपदी बढती मिळाली आहे. दाते हे मुंबईतील कायदा व सुवस्था तसेच गुन्हे शाखेचे सह पोलीस आयुक्त होते. २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात दाखवलेल्या शौर्याबाबत दाते यांचा गौरवही करण्यात आला. ते तीन वर्षे केंद्रीय राखीव पोलीस दलाचे अतिरिक्त पोलीस महासंचालकही होते. मिरा-भाईंदर पोलीस आयुक्त म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



तिथं आधीच चिमणीचा प्रॉब्लेम आहे !!!

शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या

राजदंडधारी सिंहासनाधिष्ठीत मूर्तीची ढोल ताशांच्या वाद्यात प्रतिष्ठापना

✔ सुराज्य/सोलापूर

शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने यंदा नव्याने १२ फुटी फायबरमधील आकर्षक मूर्तीची भव्य मिरवणुकीने प्रतिष्ठापना करण्यात आली. माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी पालकमंत्री विजयकुमार यांच्या हस्ते विविधीवत पुजा करून ढोल ताशाच्या वाद्यात वाजत गाजत जय भवानी छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणा घेत डोक्यावर भगवी टोपी. पारंपारिक वाद्याचा गजर ... भगवे झेंडा अशा शिवमय वातावरणात मिरवणूक काढली.

१८ रोजी पाळणा तर १९ फेब्रुवारी रोजी निघणाऱ्या मिरवणुकीसाठी सोलापूर शिवप्रेमी सज्ज झाले आहे. त्या पार्श्वभूमीवर शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने यंदा नव्याने शिवमूर्ती साकारण्यात आली आहे.

माजी उपमहापौर पद्माकर काळे यांच्या अध्यक्षतेखाली यंदाच्या वर्षी महाराष्ट्रातील एकमेव अशी राजदंडधारी

छत्रपती शिवाजी महाराजांची सिंहासनाधिष्ठीत उत्सव मूर्ती बनविण्यात आली आहे. १२ फुटी फायबरमधील ही आकर्षक मूर्ती ख्यातनाम शिल्पकार उमेश व्हरकट (पुणे) यांनी साकारली आहे. सायंकाळी छत्रपती संभाजी महाराज चौकातून भव्य मिरवणूक काढण्यात आली त्यापूर्वी माजी केंद्रीयगृह मंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी पालकमंत्री विजयकुमार देशमुख, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, राष्ट्रवादीचे शहाअध्यक्ष भारत जाधव, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, मध्यवर्ती महामंडाळाचे ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, पुरुषोत्तम बरडे, उत्सव अध्यक्ष मतिन बागवान, यांच्या उपस्थित विधिवत पुजा करून मिरवणुकीस सुरुवात करण्यात आली. मिरवणूक छत्रपती संभाजी महाराज चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, टिळक चौक, माणिक चौक -सोन्या मारुती, दत्त चौक, राजवाडे चौक, नवी पेठ शिवस्मारक मार्गे दळिंबी आड येथे समारोप करण्यात आला.

स्वप्न जरूर असावे, पण

भारत राष्ट्र समितीचे सर्वेसर्वा के. चंद्रशेखर राव किंवा केसीआर हे राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून आहेत. नांदेडच्या नुकत्याच झालेल्या दौऱ्यातून हे दिसून आले. तेलंगणा राष्ट्र समितीचे नाव बदलून त्यांनी भारत राष्ट्र समिती हा नवा पक्ष स्थापन करून त्यांनी आता दक्षिणेतून दिल्लीकडे कूच करण्याचे स्वप्न बाळगले आहे.एखाद्या नेत्याची महत्त्वाकांक्षा असू शकते. त्यात काहीच गैर नाही पण आजचे राजकारण असल्या धराला गेले आहे की-त्या नेत्याची आशा खरीच पूर्ण होणार का? हा खरा प्रश्न आहे. एकेकाळी केंद्रीय सत्तेत दक्षिणेतील राज्यांचे वर्चस्व होते. आजही तिथे प्रादेशिक पक्षांची सत्ता आहे परंतु त्यांच्यात एकी होत नाही. उत्तर भारतात आणि कर्नाटक, महाराष्ट्र व गोवा या राज्यांमध्ये भाजपने आपली ताकत तयार केली. त्यातून केंद्रीय सत्ता त्यांच्या हाती आली.त्यासाठी भाजपला अनेक वर्षांचा त्याग करावा लागला आहे. केसीआर यांच्याकडे २०१४पासून तेलंगणच्या मुख्यमंत्रिपदाची धुरा आहे. आंध्रप्रदेशमधून स्वतंत्र तेलंगण राज्य निर्मितीसाठी राव यांनी लढा दिला. २००१ मध्ये तेलुगू देसम सोडून तेलंगण राष्ट्र समितीची स्थापना केली. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये त्यांनी पक्षाचे नामकरण भारत राष्ट्र समिती असे केले. एकूणच राव यांचा यातून राष्ट्रीय स्तरावर राजकारण करण्याचा इरादा स्पष्ट होतो. तेलंगणमध्ये लोकसभेच्या १७ जागा आहेत. केवळ त्यांच्या जोरावर देशव्यापी राजकारण अशक्य असल्याचे राजकीय जाणकारांना वाटते. पक्ष विस्तारासाठी ते दौरे करत आहेत. राज्याबाहेर पहिल्या सभेसाठी त्यांनी नांदेड निवडले. यामध्ये काही पत्रकार, माजी आमदारांनी या पक्षात प्रवेश केला. केसीआर यांचा पक्ष दुसऱ्यांदा म्हणजे २०१८मध्ये तेलंगणमध्ये पुन्हा सत्तेत आला. प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसला जेमतेम २० जागा मिळाल्या, तर भाजपला एकच जागा जिंकता आली. मात्र, गेल्या तीन वर्षांत

राज्यातील राजकारण झपाट्याने बदलले आहे. भाजपने केसीआर यांच्या पक्षातून प्रमुख नेते फोडत त्यांच्यापुढे आव्हान उभे केले आहे. यावर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत सत्ता टिकवण्याचे त्यांच्यासाठी आव्हान आहे. अर्थात ओवेसी यांच्या एआयएमआयएमचा हैदराबाद शहरातील काही जागांवर प्रभाव आहे. केसीआर यांच्या पक्षाशी थेट आघाडी नसली तरी, मैत्रीपूर्ण संबंध आहेत. याद्वारे राज्यातील मुस्लीम मते मिळतील, असा केसीआर यांचा कयास आहे. सत्ता टिकवण्याचा विश्वास त्यांना असला तरी, भाजपने सारी ताकद कर्नाटकपाठोपाठ दक्षिणेतील या राज्यात लावली आहे. घराणेशाहीच्या मुद्द्यावर केसीआर यांना टीकेला तोंड द्यावे लागत आहे. केसीआर यांचे पुत्र के. टी. रामाराव हे राज्यात कॅबिनेट मंत्री असून, माहिती तंत्रज्ञान खात्याची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. तेलंगणची राजधानी हैदराबादचे या क्षेत्रातील महत्त्व पाहता राव यांच्या पुत्राच्या खात्याच्या प्रभावाची कल्पना येते. पक्षसंघटनेतही त्यांच्या शब्दाला मोठा मान आहे. याखेरीज त्यांची कन्या कविता या विधान परिषदेच्या सदस्या आहेत. पूर्वी त्या निजामाबादच्या खासदार होत्या. मात्र, गेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांचा पराभव झाला. गेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपने चार तर काँग्रेसने तीन जागा जिंकून केसीआर यांच्या राज्यातील वर्चस्वाला धक्का दिला होता. लोकसभा निवडणुकीपूर्वी बिगर भाजप, बिगर काँग्रेस पक्षांची आघाडी स्थापन करण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू होते. मात्र, लोकसभा निवडणुकीत राज्यात अवघ्या ९ जागा मिळाल्याने त्यांच्या दिल्लीच्या मोहिमेला खीळ बसली. आता पुढील वर्षीच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या तोंडावर केसीआर पुन्हा राष्ट्रीय राजकारणासाठी सरसावले आहेत. तेलंगण सरकारच्या अनेक कल्याणकारी योजना जनतेपर्यंत पोहचल्या. यातून केसीआर यांचे सरकार लोकप्रिय झाले. आता ८ वर्षातील सत्तेनंतर अनेक आश्वासने पूर्ण केली नसल्याचा आरोप होत असल्याने त्यांच्या पक्षावर दबाव आहे. केंद्र सरकारच्या पहिल्या टप्प्यात १४ ते १९ या काळात केसीआर यांच्या पक्षाचा भाजपशी फारसा थेट संघर्ष नव्हता. मात्र, तेलंगणवर जसे भाजपने लक्ष्य केंद्रित केले तसे केसीआर यांना भाजप हाच प्रमुख विरोधक असल्याची जाणीव झाली. आताही संसद अधिवेशनात अदानी मुद्द्यावर भारत राष्ट्र समितीने संयुक्त संसदीय समितीद्वारे चौकशीसाठी आग्रही भूमिका घेतली आहे. संसदेत घोषणाबाजीत त्यांचे सदस्य आघाडीवर होते. शेतकऱ्यांच्या हिताचे सरकार ही घोषणा देत समाजातील एक मोठा वर्ग पाठीशी राहावा ही त्यांची धडपड आहे. निव्वळ बाहेरील पक्षातील व्यक्तींना प्रवेश देऊन राष्ट्रव्यापी पक्ष होणे कठीण आहे. नांदेडमध्ये राव यांनी तेलंगणबाहेर पहिली सभा घेतली. या परिसरातील नागरिकांची रोज कामानिमित्त तेलंगणमध्ये ये-जा सुरू असते. त्यामुळे हा भाग त्यांनी सभेसाठी निवडला, सभेला गर्दीही जमवली. आता याचे मतात रूपांतर कितपत होईल हे येणारा काळ सांगत राहील.

प्रकट दिन

श्री संत गजानन महाराजांची महिमा अपरंपार आहे ही बाब सर्वांनाच ज्ञात आहे. त्यामुळेच त्यांना ब्रम्हांडनायक राजाधिराज योगीराज असे संबोधले जाते. कारण त्यांची महिमा संपूर्ण ब्रह्मांडात प्रचलित असल्याचे दर्शविते. आज जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तर आपल्या लक्षात येईल की भारतात महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. कारण महाराष्ट्रात अनेक थोर संत, महात्मे झालेत त्यातलेच संत गजानन महाराज आहेत.

श्री संत गजानन महाराज एक दैवी शक्ती

आपल्याला गजानन महाराजांचे अनेक चमत्कार दिसून येतात. त्याचप्रमाणे संपूर्ण भारतात शांततेचे प्रतिक म्हणून शेगावचे गजानन महाराजांचे मंदिर प्रसिद्ध आहे. संत गजानन महाराज दि. २३ फेब्रुवारी १८७८ रोजी शेगावमध्ये तारूण्याअवस्थेत प्रकट झालेत. आज संपूर्ण भारतात श्री संत गजानन महाराजांमुळे महाराष्ट्रातील शेगाव हे गाव प्रसिध्दीस आले. साधू देविदास पातूकर यांच्या मठाबाहेर पडलेल्या उष्ट्या पत्राळीतील अन्नाचे कण वेचून खात होते व गाईगुरांकरिता पिण्यासाठी ठेवलेले पाणी पिऊन निघून गेले. ते पुढे बार्शी येथील ब्रह्मनिष्ठ श्रीगोविंद महाराज टाकळीकर यांचे शेगावी महादेवाच्या मंदिरात कीर्तन झाले. त्याप्रसंगी टाकळीकरांच्या बेफाम असलेल्या घोड्यांच्या चौपायांत श्री गजानन महाराज हे ब्रह्मानंदी निमग्न होऊन निजलेले आढळले. परंतु तुफान घोडा शांत झाला. अशाप्रकारे तुफान घोड्याला गजानन महाराजांनी शांत केले. ताल्काळ गोविंदमहाराजांनी संत गजानन महाराजांची योग्यता ओळखून भक्तीभावाने पूजा केली व त्यांची महती शेगाव निवासी लोकांना सांगितली. तेंव्हापासूनच संत श्री गजानन महाराजांची प्रसिध्दी झाली. यानंतर महाराजांचे अनेक चमत्कार लोकांना दिसून आले. बंकटलाल अग्रवाल यांना गजानन महाराज प्रथमच दिसले असता 'गण गण गणात बोते' असे उच्चारत त्यांचे भजन नेहमीच सुरू असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांनी 'गजानन महाराज' ही अद्भूत शक्ती असल्याचे लक्षात आले व 'गण गण गणात बोते' हा जाप सर्वांच्याच हृदयात बसला व गजानन महाराजांची महिमा संपूर्ण शेगावी पसरली.कारण गजानन महाराज ही दैवी शक्ती होती आणि आहे. गजानन महाराजांचे अनेक चमत्कार आपल्याला वेगवेगळ्या ठिकाणी आणि वेगवेगळ्या रूपात पहायला मिळतात. महाराजांच्या तीर्थानेच जानराव देशमुख नावाच्या गृहस्थ मरणोन्मुख स्थितीतून बरे झाले. अनेक भक्तांना साक्षात पांडुरंगाचे दर्शन गजानन महाराजांनी घडविले.गजानन महाराज हे दिगंबर वृत्तीतील सिध्दकोटीला पोहचलेले महान संत होते. त्यांची दिनचर्या अशा पध्दतीची होती की वाटेल ते खावे, कोठेही पडून रहावे व कोठेही संचार करावा अशा पद्धतीने ते रहात असे. एकेवेळी तर एका स्त्रीने मिर्चीचा वाटलेला मोठा गोळा खायला दिला तो गोळा त्यांनी मोठ्या आनंदाने खाल्ला जनुकाय पेढे-बर्फी खातात त्याप्रमाणे खाल्ला व लोटाभर पाणी पिऊन तृप्त झाले व 'गण गण गणात बोते' असे अहर्निश भजन उच्चारत निघून गेले. गजानन महाराजांच्या मुखातून नेहमीच 'गण गण गणात बोते' या शब्दांचे उच्चारण व्हायचे त्यामुळे संपूर्ण भक्तगण श्री संत गजानन महाराज म्हणून संबोधू लागले.गजानन महाराजांची अपार महिमा पाहून लोक त्यांना बहुमोल वस्त्रे, अलंकार, पैसे, खाद्यपदार्थ अर्पण करीत. परंतु हे सर्वच तेथेच टाकून निघून जात असे. मुख्यत्वेकरून भक्तांना व जनतेला गजानन महाराजांच्या सहवासाने मन:शांती मिळे व त्यांच्या ईश्वरलीलेमुळे सर्व भक्तगण प्रसन्न रहात.आजही महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात श्री संत गजानन महाराजांची पुजाअर्चना मोठ्या भक्तिभावाने व उत्साहाने साजरी केली जाते. त्याच अनुषंगाने दरवर्षी माघ कृष्णपक्ष सप्तमीला श्री संत गजानन महाराजांचा प्रगट दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. यावर्षी माघ कृष्णपक्ष सप्तमीला दि. १३ फेब्रुवारीला संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने गजानन महाराजांचा १४५वा प्रगट दिवस साजरा होत आहे. दरवर्षी विठ्ठलाच्या दर्शनासाठी शेगाववरून संत गजानन महाराजांची पालखी जात असते व पालखी सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा होतो. कारण गजानन महाराजांनी विठ्ठलरूपी अनेकांना दर्शन दिले आहे. दररोज शेगावला हजारोंच्या संख्येने वेगवेगळ्या भागातून भाविक श्री संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी येतात. त्याचप्रमाणे याठिकाणी दररोज मोठ्या प्रमाणात महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. कारण महाराष्ट्रासह अनेक राज्यातून महाराजांचे दर्शन करण्यासाठी मोठा जनसैलाब असतो. अशाप्रकारे श्री संत गजानन महाराजांची लीला अपरंपार असल्याचे आपल्याला दिसून येते. महाराष्ट्रात घरोघरी गजानन महाराजांची पुजाअर्चना करून भक्तीभावाने संत गजानन महाराजांचा गजर करतात व आपली मनोकामना पूर्ण करतात. त्याचप्रमाणे प्रगट दिनाच्या निमित्ताने अनेक गावांत, शहरात मोठ्या प्रमाणात भजन, कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते व आपल्याला सर्वत्र गजानन महाराज गजर ऐकायला मिळतो. संत गजानन महाराज हे महान संत होऊन गेले. त्यामुळे त्यांच्या प्रगट दिनाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होणे गरजेचे आहे. कारण दिवसेंदिवस जंगलसंपदा नष्ट होताना आपण पहातो. परंतु प्रगट दिनाच्या निमित्ताने फुल-नाही, फुलांची पाकळी म्हणून वृक्षारोपण व्हायला हवे. कारण जंगल तोडीमुळे संपूर्ण निसर्गाचे संतुलन डगमगताना दिसत आहे व हे सर्व आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. याचाच परिणाम आपल्यालाच नाही तर संपूर्ण जगाला भोगावा लागतो आहे. याचेच उदाहरण म्हणजे तुर्की-सीरियातील महाकाय भूकंप आहे. आपण निसर्गाचे संतुलन व्यवस्थित ठेवले नाही तर सुनामी, भूकंप, वनवा लागणे, समुद्राची पातळी वाढणे, अती थंडी, अती उष्णता, अती पाऊस याला मोठ्या प्रमाणात उफान येऊ शकते व यामुळे मानवास, पशु-पक्षी, जीवजंतू यांची मोठी हानी होऊ शकते. याकरीता आज निसर्गाला वाचविण्यासाठी वृक्षलागवड ही काळाची गरज आहे. आपण व संपूर्ण भक्तगणांनी श्री संत गजानन महाराजांच्या प्रगट दिनाच्या निमित्ताने वृक्षलागवड केली तर निसर्ग प्रफुल्लित राहते व झाडांच्या पानात, फुलात, फळात आपल्याला गजानन महाराजांचे दर्शन अवश्य होईल. कारण गजानन महाराजांचे संपूर्ण जीवन हे झाडांच्याच सानिध्यात राहिले आहे.



|| जय गजानन ||

वृक्षलागवडीमुळे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन व सावली मिळेल. यातच आपल्या साक्षात संत गजानन महाराज अवश्य दिसून येईल व आपण केलेल्या कार्याच सार्थक अवश्य दिसून येईल. त्यामुळे भक्तांना आग्रहाची विनंती आहे की प्रकट दिनाच्या निमित्ताने जास्तीत जास्त वृक्षारोपण व्हावे या दृष्टिकोनातून पाऊल उचलण्याची नितांत गरज आहे. श्री संत गजानन महाराजांच्या १४५व्या प्रकट दिनानिमित्त कोटी कोटी प्रणाम. जय गजानन महाराज.

- रमेश लांजेवार.
माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर.

टुडेज् ब्लॉग

बॉलिवूड कलाकारांची हॉलिवूड 'भरारी'

बॉलिवूडच्या कलाकारांना हॉलिवूडचे आकर्षण नेहमीच राहिले आहे. विशेष म्हणजे काही बॉलिवूडच्या अभिनेता-अभिनेत्रींनी हॉलिवूड चित्रपटांमध्ये आपल्या 'अभिनयाचे जलवे' दाखवलेही आहेत. विषय आणि आवश्यकतेनुसार बॉलिवूडदेखील हॉलिवूडच्या कलाकारांना 'गांधी' सारख्या चित्रपटांमध्ये संधी देत आला आहे. आजतागायत हे सांस्कृतिक आदान-प्रदान चालूच आहे. सध्या बॉलिवूडचे काही कलाकार हॉलिवूड चित्रपटांमध्ये सक्रिय आहेत. या सक्रीयतेवर एक दृष्टिक्षेप...

भारतीय चित्रपटांमध्ये आपले स्थान पटकवल्यानंतर आणि देशभर प्रसिध्दी मिळाल्यानंतर प्रत्येक कलाकाराची आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले 'हुनर' दाखवण्याची, त्याचा प्रसार करण्याची इच्छा असते. आंतरराष्ट्रीय सिनेमामध्ये हॉलिवूडची आपली एक प्रतिष्ठा आहे. बॉलिवूडच्या जुन्या कलाकारांचा विचार केला तर आपल्याला असे लक्षात येईल की, शशी कपूर, ओमपुरीपासून इरफान खानपर्यंत अनेकांनी हॉलिवूड चित्रपटांमध्ये आपले एक स्वतःचे स्थान निर्माण केले होते. या स्पर्धेत आपल्या अभिनेत्रीदेखील मागे नाहीत. ऐश्वर्या रॉय, मल्लिका शेरावत, प्रियांका चोप्रा, दीपिका पादुकोन, आलिया भट्ट यांनी देखील हॉलिवूड चित्रपटांमध्ये आपला 'हुनर' दाखवला आहे.

अलिकडेच आलिया भट्ट 'हार्ट ऑफ स्टोन' या हॉलिवूड चित्रपटात काम केले असून ती यानिमित्ताने बराच काळ लंडनमध्ये शूटिंगसाठी व्यस्त होती. २०२१ मध्ये हुमा कुरेशी हिने झंक स्नायडरच्या 'आर्मी ऑफ द डेड' मधून हॉलीवूडमध्येही पदार्पण केलं आहे. त्यापूर्वी ती गुरिंदर चड्ढा यांच्या 'व्हाइसरॉय हाऊस'चाही भाग होती. हॉलिवूड चित्रपटांमध्ये सध्या ज्या अभिनेत्री सक्रिय आहेत, त्यात डिंपल कापडिया यांचे नाव पुढे

आहे. डिंपल यांनी हॉलिवूड दिग्दर्शक क्रिस्टोफर नोलन यांच्या 'टेनेट' चित्रपटामध्ये काम केले आहे. हा चित्रपट २०२० मध्ये ब्रिटन आणि अमेरिकेत प्रदर्शित झाला होता. रणदीप हुड्डा याने 'मान्सून वेडिंग' मध्ये काम केले होते. याशिवाय त्याने '२०२० प्रदर्शित झालेल्या एक्सट्रेक्शन' मध्येदेखील काम केले आहे. यात क्रिस हेम्सवर्थने प्रमुख भूमिका साकारली होती. हा चित्रपट सध्या नेटफ्लिक्सवर पसंद केला जात आहे. पंकज त्रिपाठी यांनीदेखील या चित्रपटात काम केले आहे. सुनील शेट्टीसुध्दा जॅफरी चीन यांच्या 'कॉल सेंटर' चित्रपटात सरदार पोलीस इन्स्पेक्टरची भूमिका करत आहे. अली फजल 'डेथ ऑन द नील' चित्रपटात काम करत आहे. प्रियांका चोप्रा हिचे 'मॅटरिक्स', टैक्स्ट फॉर यू' देखील लवकरच प्रदर्शित होणार आहेत.

इरफान खान यांना हॉलिवूडमध्ये चांगल्या संधी मिळत होत्या. मात्र गेल्या वर्षी त्यांचे निधन झाले. 'जुरासिक वर्ल्ड', लाइफ ऑफ पई', आइ लव यू', द नेमसेक', न्यूयार्क', द अमेजिंग स्पाइडरमैन' सारख्या चित्रपटांमध्ये इरफान खान यांनी काम केले आहे. ओमपुरी यांनीदेखील 'सिटी आफ जॉय', माय सन द फेनेटिक', ईस्ट इज ईस्ट'सारख्या हॉलिवूड चित्रपटांमध्ये काम करून आपले एक वेगळे स्थान निर्माण केले होते. अमरीशपुरी यांनी स्टीवन स्पीलबर्गच्या 'इंडियाना जोंस एंड द टैम्पल ऑफ डूम' मध्ये जबरदस्त अभिनय केला होता. नसीरुद्दीन शाह यांनी मानसून वेडिंग', द लीग ऑफ एक्स्ट्राआडनरी जैंटलमेन' सारख्या हॉलिवूड चित्रपटांमध्ये काम केले आहे. अनिल कपूरनेही हॉलिवूडच्या स्लमडॉग मिलियनेयर', मिशन इंपासिबल' आणि प्रोटोकोल'मध्ये आपल्या अभिनयाची जादू दाखवली आहे.

हॉलीवूडमधील लिओनार्डो डिकॅप्रियो हा एक नावाजलेला अभिनेता हा आहे. लिओनार्डोसोबत काम करायला मिळणे ही एक मोठी गोष्ट आहे. त्यामुळे त्याच्याबरोबर काम करण्याचे स्वप्न अनेक कलाकारांचे असते. पण बॉलिवूड तसेच मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय आणि ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांनी हॉलिवूड स्टार लियोनार्डो डिकप्रियोच्या एका चित्रपटामध्ये काम करण्यास नकार दिला होता. बॉलिवूडमधील प्रसिद्ध दिग्दर्शक अनुराग कश्यप यांनी एका मुलाखतीमध्ये याबद्दल सांगितले. ते म्हणाले, 'हॉलिवूडचे दिग्दर्शक रिडले स्कॉट यांना त्यांच्या 'बॉडी ऑफ लाईज' या चित्रपटात नाना पाटेकर यांना कास्ट करायचे होते; परंतु त्यांनी दहशतवाद्याची भूमिका करणार नाही', असे सांगून ही ऑफर नाकारली. अमिताभ बच्चनपासून सलमानखानपर्यंतच्या कलाकारांना हॉलिवूड चित्रपटांच्या ऑफर मिळत असतात. पण काही कलाकारांना हॉलिवूड चित्रपटांमध्ये स्वारस्य नसल्याचेही पाहायला मिळते.

- मच्छिंद्र ऐनापुरे, जत, जि. सांगली.

जन्म हा अखेरचा

भावाचारस्थल - २

''धनामुळे अमृतत्त्व मिळत नाही तर ते त्यागामुळे मिळते.'' याज्ञवल्क्य म्हणाले.

''धनामुळे अमृतत्त्व मिळत नसेल तर हे धन घेऊन मी काय करु?'' मैत्रेयी म्हणाली.

जगातली सारी संपत्ती जरी आपण एका माणसाला दिली तरी त्याचे मन तृप्त होणार नाही. मनाची हाव इतकी मोठी आहे की, त्यासाठी हा सारा प्रपंचदेखील कमी पडतो. परिपूर्ण असे परब्रह्म मिळाले तरच मन तृप्त होऊ शकते. मनाच्या झोळीत कितीही दान टाकले तरी ती रिकामी ती रिकामीच राहते. आजवर सांसारिक वस्तूंनी मन तृप्त झाल्याचे एकही उदाहरण नाही. ज्याच्या मनात शिवभावनेचा उदय होतो आणि ज्याला शिवपरब्रह्माची प्राप्ती होते असा मनुष्य मात्र पूर्ण तृप्त असतो. त्याला अन्य कोणत्याही विषयांची किंवा वस्तूंची आवश्यकता नसते. शिवभावनायुक्त होऊन जो कर्म करतो तो संसार-संगापासून मुक्त होतो. अर्थात् त्याच्या मनात सांसारिक वस्तूंविषयी आसक्ती राहत नाही. शरीराचा संसाराशी संबंध असावा. परंतु मनाने संसारापासून अलिप्त राहावे. हीच योग्यांची जीवनकला आहे. ही कला ज्याला साधते, त्याला संसाराची बाधा होत नाही. संसारी माणसे 'हे मी केले नाही' असे वरवर म्हणतात. परंतु त्यांच्या मनात मात्र कर्माबद्दल अहंभाव जागा असतो. एखाद्याने घर बांधले आणि तुम्हांला दाखवले तेंव्हा तुम्ही सहज म्हणता की, 'छान बांधले आहे घर.' तेंव्हा तो म्हणतो, 'छे! मी कुठे काय केलं, ही तर ईश्वराची कृपा आहे.' तो ईश्वराला श्रेय देतो ते केवळ वरवर बोलण्यातून. परंतु त्याच्या मनात मात्र 'हे माझे कर्तृत्व आहे', असा अहंकार असतो.

(क्रमशः) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.

जनमानस

लिथियमच्या साठ्यांमुळे वस्तूंच्या किंमती घटाव्यात

वर्तमानात स्मार्टफोन्स, इलेक्ट्रिक वस्तू, वाहने आणि बॅटरीवर चालणाऱ्या उत्पादनांत ज्या नॉनफेरस धातूचा प्रामुख्याने वापर केला जातो, त्या लिथियमचा साठा भारतातील जम्मू काश्मीरमधील रियासीमध्ये भूवैज्ञानिक सर्वेक्षण करताना आढळला आहे. वाढणाऱ्या किंमतीमुळे जगातील बहुतेक देश पेट्रोलियम उत्पादनांचा वापर कमी करू इच्छित आहेत. त्याऐवजी लिथियम आयनयुक्त बॅटरीज ज्यामध्ये अक्षय ऊर्जा साठविता येते, त्यांच्या वापराकडे झुकत आहे. पेट्रोलियमला पर्यायी लिथियमचे साठे चिली, अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, चीन, युक्रेन, अमेरिका, ब्राझील, झिम्बाब्वे अफाट साठे सापडत असून चीन, चिली, अमेरिका, रशिया हे देश लिथियमचे प्रमुख निर्यातदार असून, जपान, बेल्जियम, द. कोरिया, जर्मनी आणि भारत हे देश त्याचे मोठे आयातदार आहेत. इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला मागणी येऊ लागल्यामुळे या शतकाच्या प्रारंभापासून लिथियमच्या मागणीत ३० पटीने वाढ झाली. परिणामी त्याच्या किंमतीही चौपट वाढल्या. सध्या ७ अब्ज लिथियम आयनयुक्त बॅटरीजची जगात विक्री होत आहे. प्रदूषणमुक्त स्वच्छ ऊर्जेसाठी जुनी वाहने भंगारात काढून इलेक्ट्रिक वाहनांवर लक्ष केंद्रित करण्याचे धोरणकेंद्र सरकारने स्विकारले असल्यामुळे देशात लिथियम

बॅटरीच्या मागणीत प्रचंड वाढ होणार आहे. अशावेळी देशातच लिथियमचा साठे सापडत असल्यामुळे भारताची लिथियम आयातीवरील अवलंबित्व बऱ्याच प्रमाणात कमी होणार आहे. त्याचबरोबर त्याच्या आयातीची किंमत विदेशी चलनात देण्याची गरज भासणार नाही, ही जमेची बाजू आहे.

ह्या सर्वांचा परिणाम भारतीयांना लिथियम बॅटरीचा वापर होणाऱ्या भारतीय बनावटीच्या वस्तूंचे दर कमी होतील, अशा अपेक्षा आहेत. - स्नेहा राज, गोरेगांव.

पाश्चात्य संस्कृतीचा अनुकरण नको...

व्हॅलेंटाईन डे व त्याबरोबर असणारे अनेक 'डे' साजरे करावेत की नाही? यावर वादविवाद होतात. पण सद्यस्थितीत ज्या पद्धतीने 'डे' साजरे होतात त्यावरून ही संस्कृती आपली नाही हेच पटते. काही ठिकाणी यावरून वाद, तरुणांमध्ये हाणामाऱ्या, झाल्याच्या बातम्या आहेत. भेटवस्तू, वेगवेगळ्या प्रकारचे गिफ्ट खरेदीसाठी पालकांना खर्च करावा लागतो.

- फुलचंद्र काळे, नाशिक.

प्रकटदिनानिमित्त

सिद्धयोगी श्री संत गजानन महाराज

महाराष्ट्र जसा निसर्गाने आणि तीर्थ क्षेत्रांनी सजलेला आहे तसा तो निरनिराळ्या संतांच्या जन्माने आणि प्रकटीकरणाने पवित्र देखील झालेला आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे, इतकेच नव्हे तर अध्यात्म्याचे विद्यापीठ देखील आहे. ह्या भूमीवर संत तुकाराम, अक्कलकोट स्वामी समर्थ, शंकर महाराज, रामदास स्वामी, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर, संत सावता माळी, संत नामदेव, गोरा कुंभार अशी कितीतरी नावे घेता येतील. मात्र, शेगावीचे श्री संत गजानन महाराज यांचा जन्म किंवा त्यांचा प्रकटदिन मात्र कोणालाही ज्ञात नाही. श्री देविदास पातूरकर यांच्या घरासमोर टाकलेला उष्ट्या पत्रावळीतील अन्नाचे कण वेचून खात असताना व गाईगुरांना पिण्यासाठी ठेवलेल्या ठिकाणचे पाणी पिताना श्री बंकटलाल अग्रवाल यांच्या सर्व प्रथमदृष्टीस पडले. तो दिवस म्हणजे शके १८०० म्हणजे २३ फेब्रुवारी १८७८ हा होय.

एके दिवशी भल्या पहाटे बाल अवस्थेत गजानन महाराज अक्कलकोटला स्वामीसमर्थांच्या आश्रमात पोहोचले. दोघांचीही एकमेकांवर नजर पडताच दोघांनीही परस्पर एकमेकाला ओळखले. स्वामींनी बाल गजाननाची मूर्ती न्याहाळली आणि त्यांना स्वामींनी सिध्दपुरुष होण्याचा आशीर्वाद दिला. तेंव्हापासून बाल गजाननाची मूर्ती ही तेजस्वी मुद्रा वाटू लागली. स्वामीसमर्थांनी बाल गजाननास आध्यात्मिक धडे दिले. त्यानंतर त्यांनी भक्तांच्या कल्याणासाठी जाण्याची आज्ञा केली. तेथून नाशिकला आले व त्यानंतर शेगावी येथे येऊन स्वामींच्या आज्ञेने भक्तांचा उध्दार केला. श्री संत गजानन महाराज हे अत्यंत परमोच्च स्थितीला पोहोचलेले असे 'ब्रह्मवेत्ते' महान संत होते. ते परमहंस संन्यासी होते. त्यांची अवधूत अवस्था असल्याने त्यांना दंड, भगवी वस्त्रे याची आवश्यकता नसे. अनेकांना संन्यासी रुपात दर्शन दिल्याचा उल्लेख 'श्री गजाननविजय' ह्या ग्रंथात आढळतो.

आपल्या आयुष्याच्या बत्तीस वर्षात गजानन महाराजांनी भक्तजनांना मार्गदर्शन केले, अनेकांना साक्षात्कार घडवला, अनेकांना चमत्कार करुन दाखवले आणि त्यासाठी चैतन्यमय देहाने संचार केला. ते स्वतः सिध्दयोगी पुरुष असल्याने भक्त लोकांना भक्तीमार्ग व त्याचे महत्व कथन केले. 'गण गण गणांत बोते' हा सिध्द मंत्र त्यांनी सांगितला. त्यांच्या मनात चाललेल्या ह्या मंत्रामुळे भक्तगण त्यांना गजानन महाराज या नावाने ओळखू लागले. त्यांचे जीवन हे गूढच होते. भल्याभल्या लोकांना ते समजले देखील नाहीत. भक्तांचा उध्दार करण्याचा आणि कल्याण करण्याची त्यांची शैलीच वेगळी होती. काहीच न बोलता सर्व काही बोलून जात, काहीच न सांगता सर्व काही सांगून जात असा भक्तलोकांचा अनुभव आहे.

त्यांच्या वास्तव्यामुळे वऱ्हाडीतील शेगाव हे गाव सुप्रसिध्द झाले.

शेगाव हे बुलढाणा जिल्ह्यात असून पूर्वी खामगाव तालुक्यातील प्रसिध्द असे शहर होते. श्री गजानन महाराज हे त्रिकालज्ञानी होते. भूत, भविष्य, वर्तमान याविषयी ते आधीच जाणून असावयाचे. मानवी संकट आल्यावर ईश्वरावाचून कोणीही तारणार नाही हे ईश्वरीतत्व जाणण्यासाठी शास्त्रात कर्म, भक्ती व योग असे तीन मार्ग त्यांच्या शिकवणीतून प्रामुख्याने आढळतात. यामुळे याच ईश्वरी साहाय्याने रंजले गांजलेल्यांना मार्गदर्शन करुन सन्मार्ग दाखवला. परमार्थात खोटेपणा मुळीच नसतो, हे तत्वज्ञान त्यांनी 'श्री गजानन विजय' या पोथीमध्ये सांगितले.

- रामकृष्ण अघोर, सोलापूर.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळये.

उद्योजकांना सुविधा देण्यासाठी कटिबद्ध : उद्योगमंत्री

जिल्ह्यातील औद्योगिक संघटनांच्या समस्या घेतल्या जाणून

✔ सुराज्य/सोलापूर

औद्योगिक प्रगती झाली तर रोजगार निर्मिती होईल. रोजगार निर्माण झाला तर बेरोजगारांच्या हाताला काम मिळेल. यातूनच देशाची प्रगती होईल. त्यामुळे उद्योजक आणि उद्योगांचे प्रश्न प्राधान्याने मार्गी लावून, त्यांना सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याची ग्वाही राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली.

उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आज जिल्ह्यातील औद्योगिक संघटनांसमवेत चर्चा करून त्यांच्या समस्या व अपेक्षा जाणून घेतल्या. नियोजन भवन येथे आयोजित या बैठकीस जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, एमआयडीसीच्या प्रादेशिक अधिकारी वसुंधरा जाधव, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष कोलते, महानगरपालिकेचे अतिरीक्त आयुक्त संदीप कारंजे, महावितरणचे अधीक्षक अभियंता एस. के. सांगळे, सोलापूर एमआयडीसी इंडस्ट्रिअल असोसिएशनचे राजू राठी,एमआयडीसीचे अधीक्षक अभियंता, एस आर गावडे, कार्यकारी अभियंता एस एस गांधीले, भरत शहा यांच्यासह औद्योगिक संघटनांचे पदाधिकारी, प्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते. सोलापूर जिल्ह्यातील स्थानिकांना प्राधान्याने रोजगार उपलब्ध व्हावेत. तसेच कुशल कामगार निर्मितीसाठी प्रशिक्षण केंद्राला जागा उपलब्ध करण्यात येणार आहे. चिंचोली एमआयडीसीमध्ये इमारत तयार आहे. आयटीसाठी ही इमारत दिली जाऊ शकते. त्यातील अडथळे दूर करून त्यावर मार्ग काढावा, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

सोलापूरला अधिकाधिक उद्योग यावेत, तसेच सोलापूरच्या औद्योगिक प्रगतीतील अडथळे दूर करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू. होटगी विमानतळावर नियमित विमानसेवा सुरू करण्यासंदर्भात मुख्यमंत्री यांच्या समवेत बैठक घेऊन यावर निर्णय येतला जाईल.

सोलापूर जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्गाचे जाळे वाढल्याने सोलापुरात नवीन औद्योगिक क्षेत्र होणे गरजेचे आहे. उद्योजकांना उद्योग निर्मितीसाठी कोणतीही अडचण येणार नाही. तसेच जिल्ह्यातील बेरोजगार तरुणांना मोठ्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध होईल, अशी माहिती जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी उद्योगमंत्रांना यावेळी दिली.

औद्योगिक संघटनांनी त्यांच्या अडचणी मांडल्या. यामध्ये सोलापूरच्या वस्त्रोद्योग व विडी उद्योगासाठी महिलांना प्रशिक्षण देण्यासाठी कौशल्ये विकास केंद्राची मागणी, ट्रक टर्मिनल्स उभारणे, विना वापर पडून असणाऱ्या औद्योगिक जागांचा वापर करणे तसेच औद्योगिक क्षेत्रासाठी सुरळीत पाणीपुरवठा करणे, औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांच्या हद्दीतील साफसफाई, औद्योगिक वसाहतीतील उद्योजकांना जागा उपलब्ध करून दण्याबाबत मागणी केली.

माळशिरस तालुक्यामध्ये एमआयडीसी मंजूर करण्याबाबत सामंत यांना निवेदन

✔ **नातेपुते** : बाळासाहेबांची शिवसेनेचे माळशिरस तालुका प्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी सोलापूर येथे उद्योगमंत्री उदय सामंत यांची भेट घेऊन माळशिरस तालुक्यामध्ये एमआयडीसी मंजूर करण्याबाबत निवेदन दिले आहे. निवेदनामध्ये अशी मागणी करण्यात आली आहे की, माळशिरस तालुका हा एकूण चार जिल्ह्याच्या सिमेवर असून यामध्ये सोलापुर, पुणे, सातारा आणि सांगली हे जिल्हे माळशिरस तालुक्या पासुन १५० ते १८० कि. मी. अंतरावर आहेत. माळशिरस तालुक्यात चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळते परंतु शिक्षण पूर्ण झाल्यानंतर ज्या ठिकाणी ज्या जिल्ह्यात एमआयडीसी आहेत अशा ठिकाणी माळशिरस तालुक्यातील मुलामुलींना नोकरीसाठी जावे लागते. म्हणून माळशिरस तालुक्यामध्ये एमआयडीसी मंजूर करून घ्यावी. त्यामुळे तालुक्यातील मुलामुलींची नोकरीसाठी बाहेरील जिल्हयात होणारी पळापळ थांबेल. .तसेच आपले सरकार एमआयडीसी बाबत तात्काळ निर्णय घेऊ शकते. नुकतेच सरकारने माळशिरस तालुक्यासाठी वर्षनवर्ष रखडलेली निरा देवधर योजना २२ गावासाठी शेतकऱ्यांना शेती पाण्यासाठी मंजूर केली. तसेच फलटण- पंढरपूर रेल्वेही मंजुर करण्यात आली. तसेच सरकारकडून माळशिरस तालुक्यासाठी एमआयडीसी मंजुर करण्यात यावी अशा अपेक्षेचे निवेदन बाळासाहेबांची शिवसेनेचे माळशिरस तालुका प्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांना देण्यात आले. यावेळी शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख शिवाजीराव सावंत, जिल्हा प्रमुख अमोल शिंदे, मनिष काळजे, महेश चिवटे, उपजिल्हाप्रमुख महावीर देशमुख, पंढरपूर ता. प्रमुख शिवाजी बाबर, माळशिरस तालुका शिवसेनाप्रमुख राजकुमार हिवरकर पाटील, पोपट शिंदे, जावीद मुलाणी दादा मुलाणी, दत्ता बोडरे आदी उपस्थित होते.



उद्योगमंत्री सामंतांना जाधव यांचे विकास कामाचे साकडे

✔ **सोलापूर** : राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांना राष्ट्रवादीच्या वतीने सोलापूर शहराच्या विकास बाबत उद्योग व्यावसायास चालना देण्यासाठी राज्यशासाकडून मदत करावी असे साकडे राष्ट्रवादीचे माजी गटनेते किसन जाधव यांनी घातले. सोलापुरातील बेरोजगार तरुणांच्या हाताला अक्कलकोट एम. आय. डी. सी. व चिंचोळी एम. आय. डी. सी. येथे रोजागार मिळावा, नवीन उद्योगाची सोलापूरात आण्यासाठी लक्ष द्यावे, एम. आय. डी. सी मध्ये चांगल्या प्रतीचे दर्जेदार रस्ते व उद्योगासाठी लागणारा पाणीपुरवठा सुधारण्यासाठी शासनपातळीवे उपाय योजना करावी. तसेच बँकांकडून नव उद्योजकांना होणाऱ्या कर्जपुरवठा अडचणी बाबत तातडीने उपाय योजना कराव्यात या मागणीचे निवेदन उद्योगमंत्री समांत यांना देण्यात आले यावेळी राष्ट्रवादी युवक प्रदेश सरचिटणीस चेतन गायकवाड, जिल्हा प्रमुख अमोल शिंदे, जिल्हा प्रमुख मनीष काळजे, संतोष गायकवाड, संतोष लोंढे, अमोल जगताप, अमन शिंगे, सक्षम मंगळवेढे, सचिन अंगडीकर, वसंत कांबळे, महादेव राठोड व उपस्थित होते. प्रारंभी मंत्री सामंत यांचा पुष्प हार .सोलापुरी चादर, सोलापुरी टॉवेल, व सोलापूरची सुप्रसिध्द शेंगा चटणी, कडक भाकरी व हुरडा व स्वामी समर्थांची प्रतिमा भेट देऊन भव्य सत्कार करण्यात आला.

मसुटा' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला

✔ **सोलापूर** : सामाजिक मनोरंजक सिनेमाच्या व्याख्येत अचूक बसणारा 'मसुटा' हा चित्रपट २४ फेब्रुवारी २०२३ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात रिलीज होणार आहे. या चित्रपटाद्वारे मराठी रसिकांसमोर एक आगळी वेगळी कथा येणार आहे. काशिबाई फिल्म्स प्रोडक्शन आणि साईसागर प्रोडक्शनची निर्मिती असलेल्या 'मसुटा' या चित्रपटाची निर्मिती भरत मोरे आणि मनेश लोढा यांनी केली आहे. अजित देवळे आणि सुनील शिंदे या चित्रपटाचे असोसिएट प्रोड्युसर्स आहेत. अजित देवळे यांनीच 'मसुटा'चं दिग्दर्शन आणि संकलनही केलं आहे.

पोलीस अधिकाऱ्यांच्या पत्नीचे हरवलेले दागिने परत केले

✔ सुराज्य/सोलापूर

टीव्हीवर गाजत असलेल्या सीआयडी मालिकेमध्ये पोलीस अधिकाऱ्याची भुमिका करणाऱ्या आर्पित कपूर यांच्या पत्नीचे लग्न मंडपातून चोरीस गेलेल्या साडेपाच तोळ्याचे गंठन फौजदार चावडी पोलीस स्टेशनच्या पोलीसांनी १२ तासाचे आतमध्ये रिकव्हर केले.

या घटनेची हकीकत अशी, मुंबई येथील टीव्ही कलाकार व सीआयडी मालिकेतील सीआयडी आर्पित कपूर व त्याची पत्नी श्रमीका हे त्यांच्या मेव्हण्याच्या लग्नासाठी शुक्रवारी १० फेब्रुवारी रोजी सोलापूर येथील वेदा बॅन्केट या मंगलकार्याल यामध्ये आले होते.लग्न लागण्यापूर्वी त्यांचे चोरीस गेलेले गंठन लग्न लागल्यानंतर दीड वाजण्याचे त्यांच्या लक्षात आले. या संदर्भात त्यांनी मंगल कार्यालयामध्ये नातेवाईकांकडे विचारपूस करून सायंकाळी ५ वा.चे सुमारास त्याने फौजदार चावडी पोलीस स्टेशन गाठले. त्यांचेकडे विचारपूस करून वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील व त्यांचे पथक लगेच तात्काळ मंगल कार्यालयात पोहोचले.सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या मदतीने व तपासाचे चक्रे फिरवून संशयित लोकांकडे तपास केला असता, हेअर ड्रेसींग करण्यासाठी आलेल्या महिलेकडे चोरीस गेलेले सोन्याचे गंठन मिळून आले. हे गंठन श्रमीका यांना परत करण्यात आलेले आहे. या प्रकाराबाबत माणुसकी दाखवत आर्पित कपूर यानी ती महीला ही घटस्पोटीत व तिला चार वर्षांची लहान मुलगी असल्याने तिच्या विरुध्द तक्रार देण्यास नकार दिला,आर्पित कपूर यानी आजपर्यंत केलेल्या सीआयडी मालिकेतील भुमिका आणि फौजदार चावडी पोलीसांकडून करण्यात आलेल्या वास्तव कामगिरी बाबत खूप साम्य असल्याचे सांगून त्याबाबत पोलीसांचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले.

जिल्ह्याच्या सर्वंकष विकासासाठी प्रशासन सकारात्मक : शंभरकर

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्याच्या सर्वंकष विकासासाठी आजच्या बैठकीत प्राप्त सूचनांबाबत पालकमंत्री यांना अवगत करून जिल्ह्याच्या सर्वंकष विकासासाठी प्रशासन जास्तीत जास्त सकारात्मक निर्णय घेईल अशी ग्वाही जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिली.

सोलापूर जिल्हा विकास आराखडा बैठकीच्या अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते. जिल्हा नियोजन भवन येथे आयोजित या बैठकीस अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूरच्या कुलगुरू मृणालिनी फडणीस, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ईशाधीन शेळकंदे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संजय माळी, पालकमंत्री संपर्क कक्षाच्या प्रमुख तथा उपविभागीय अधिकारी ज्योती कदम, पोलीस उपाधीक्षक डॉ. दीपाली काळे, जिल्हा नियोजन अधिकारी पुंडलिक गोडसे, तहसीलदार अंजली मरोड आदि व्यासपीठावर उपस्थित होते.

जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांच्या माजी विद्यार्थ्यांच्या स्नेहमेळाव्याच्या माध्यमातून, तसेच, प्राचार्य, उद्योजक व अन्य क्षेत्रातील मान्यवरांच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी विचारमंथन होण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून द्यावे. अशा सूचना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत केल्या होत्या. त्यानुसार जिल्ह्यातील शैक्षणिक, उद्योग, वैद्यकीय, पर्यटन क्षेत्रासह अन्य महत्वाच्या क्षेत्रातील मान्यवरांची बैठक शनिवारी झाली.

यामध्ये रोजगाराभिमुख प्रशिक्षण व कौशल्य विकास, औद्योगिक उत्पादनांसाठी प्रदर्शन केंद्र, गाव तिथे वाचनालय, औषधी वनस्पती उद्यान, पर्यटन केंद्रांची लघुचित्रफितीच्या माध्यमातून प्रचार प्रसिध्दी, तीर्थक्षेत्री येणाऱ्या पर्यटकांना सोयीसुविधा, कृषि विद्यापीठाची निर्मिती, पर्यावरण संवर्धन, सौरउर्जेचा वापर, जुन्या धर्मादाय रूग्णालयांचे पुनरूज्जीवन, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, आयटीहब, स्टार्ट अप, हुतात्मा स्मृती संग्रहालय निर्मिती, कृषिपूरक उद्योग, क्रीडा सुविधा उपलब्ध करून देणे आदिंबाबत मौलिक सूचना उपस्थित मान्यवरांनी केल्या. जिल्ह्याची बलस्थाने शोधून उद्योग, शिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार, पर्यटन, महिला बचत गट अशा सर्वच क्षेत्रातील विकासाला चालना देण्यासाठी या सूचना उपयोगी ठरणार असल्याचे मत जिल्हाधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

शोभा नर्सिंग होम फर्टिलिटी सेंटरमध्ये ३ हजाराव्या टेस्टट्यूब बालकाचा जन्म

✔ सुराज्य/सोलापूर

येथील जागतिक कीर्तीचे शोभा नर्सिंग होम प्रायव्हेट लिमिटेड इंडो जर्मन टेस्ट ट्यूब बेबी सेंटर आणि पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूट येथे १० वर्षाच्या कालावधीत ३ हजार टेस्ट ट्यूब बालकांचा व इतर उपचार प्रणालीने १० हजार बालकांचा अतिशय प्रगत तंत्रज्ञानाच्या साह्याने जन्म झाला आहे. या केंद्राचा समावेश सर्वाधिक यश प्रमाण असणाऱ्या जगातल्या काही निवडक केंद्रांमध्ये केला जातो. ही अतिशय अभिमानाची बाब आहे, अशी माहिती डॉक्टर मिलिंद पाटील यांनी दिली.

केवळ भारतच नव्हे तर अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, इस्रायल, दुबई, दक्षिण आफ्रिका आणि अन्य आखाती देशातून विनापत्य दांपत्य मोठ्या संख्येने सोलापुरातल्या या केंद्रावर उपचारार्थ येतात.

असा साजरा झाला सोहळा : शोभा नर्सिंग होम फर्टिलिटी सेंटरमध्ये ३ हजार टेस्ट ट्यूब बालकांच्या जन्माचा सुवर्ण क्षण उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने या सेंटरमध्ये आकर्षक अशी सजावट करण्यात आली होती. आपापल्या बालकांसह सहकुटुंब माताही मोठ्या संख्येने या ठिकाणी आवर्जून आल्या होत्या. त्यांच्या समवेत केक कापून हा आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

ज्या महिलांना टेस्ट ट्यूब बेबी पद्धतीने उपचार करूनही अपत्य प्राप्ती होऊ शकत नाही अशा महिलांना एक वेगळी उपचार पद्धती अवलंबावी लागते. त्यांच्या गर्भाच्या आवरणाला लेसर तंत्रज्ञानाने छेद देऊन उपचार केल्यास यशाचे प्रमाण वाढते.

ज्या महिलांना वारंवार टेस्ट ट्यूब बेबीच्या उपचारानंतरही यश आले नाही किंवा वारंवार गर्भपात होतो अश्या महिलांच्या गर्भाची गुणसूत्र तपासणी करून त्या गर्भाचे प्रत्यारोपण केले जाते. यामुळे यशाची टक्केवारी वाढते. या केंद्रामध्ये गर्भ हा पाच दिवसापर्यंत निरीक्षणाखाली ठेवला जातो व तो चांगला असल्यास गोठवला जातो व पुढे १ ते १२ महिन्याच्या कालावधीनंतर महिलेच्या गर्भाशयात प्रत्यारोपण केला जातो. या उपचार पद्धतीमुळे यशाचे प्रमाण वाढते, अशी माहिती त्यांनी दिली. या पत्रकार परिषदेस या केंद्रातील डॉ. शैलेश पाटील, डॉ. प्रतिभा पाटील, डॉ. मनीषा पाटील, डॉ. गायत्री आपटे, डॉ. शुभांगी बमगोडे, डॉ. ज्योती गायकवाड, डॉ. ज्योती वेरणेकर आदी उपस्थित होते.

देशभरातून जोडपी या केंद्राकडे होतात आकर्षित

या तंत्रज्ञानाचा वापर करताना फार कौशल्याने करावा लागतो आणि त्यातून गर्भ राहिल्यानंतर नऊ महिने विशेष काळजी घ्यावी लागते तसेच बालकाचा जन्म झाल्यानंतर त्याच्या वाढीवर आणि मातापित्यांच्या मनस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवावे लागते. या सर्व गोष्टी या केंद्रामध्ये आस्थेने आणि आपुलकीने केल्या जातात. त्यामुळे भारतभरातील जोडपी या केंद्राकडे आकर्षित झालेली आहेत, असे डॉक्टर मिलिंद पाटील यांनी सांगितले.

शिक्षकांच्या पगारासाठी ९० कोटींची तरतूद

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्या माहे जानेवारी व फेब्रुवारी महीन्याच्या वेतनासाठी पुरेशी तरतूद प्राप्त झाल्याने जिल्ह्यातील सर्वच तालुक्यातील शिक्षकांचा पगार एकाच वेळी होईल असे शिक्षणाधिकारी संजय जावीर यांनी शिक्षक संघाचे नेते शिवानंद भरले यांनी भेट घेतली असता सांगीतले. गेल्या सहा महिन्यापासून शासनाच्या पुरेसा आर्थिक तरतूद अभावी जिल्ह्यातील कांही तालुक्यातील शिक्षकांना वगळून पगार केला जात होत होता.

त्यामुळे शिक्षकांच्या आर्थिक अडचणी निर्माण होऊन इतर वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या कर्जाचे हप्ते थकीत राहात असल्याने सिबील रिपोर्ट खराब होत आहे म्हणून शिक्षक संघटणा गुरूसेवा परिवाराच्या वतीने मुख्यकार्यकारी अधीकारी दिलीप स्वामी याच्याकडे अडचणी मांडल्याने मुख्यकार्यकारी अधीकारी यानी वरिष्ठांना ही गोष्ट निदर्शनास आणून दिली.

जानेवारी पेड फेब्रुवारी महीन्याच्या वेतनासाठी ८९ कोटी ६२ हजार ६१५ एवढी पुरेसा निधी शासनाकडून प्राप्त झाले आहे या पुर्वीच जिल्ह्यातील सेवानिवृत्त शिक्षकाचे पेन्शन खात्यावर जमा केले आहे. शिक्षकाचा पगार १५ ते १६ तारखे दरम्यान होण्यास कांही अडचण नाही असे शिक्षणाधिकारी संजय जावीर यांनी यावेळी सांगितले. यावेळी शिवाजी पाटील मंजूनाथ भतगुणकी महिबूब सवार सतीश वाले बालाजी गुरव आदी उपस्थित होते.

डॉ. तात्याराव लहाने व डॉ. रागिनी पारेख यांच्या हस्ते

माढ्यातील शिबिरात २००० तपासणी, ४४३ शस्त्रक्रिया

✔ सुराज्य/माढा

खा.शरद पवार यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या चार दिवसीय नेत्र चिकित्सा व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरामध्ये २००० रुग्णांची तपासणी करण्यात आली असून ४४३ रूग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या .

विठ्ठलराव शिंदे बहुउद्देशीय सांस्कृतिक मंडळ निमगांव टे, माढेश्वरी बँक सांस्कृतिक मंडळ माढा, महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषद आरोग्य विभाग सोलापूर, जिल्हा शल्य चिकित्सक व योग्य अंधत्व निवारण समिती सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने माढा शहरामध्ये मोफत नेत्र चिकित्सा व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते .या शिबिरात एकुण २००० रुग्णांची तपासणी करण्यात आली. पद्मश्री डॉ तात्यासाहेब लहाने व डॉ रागिनी पारेख यांच्या हस्ते ४४३ रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या .रविवार दि.१२ रोजी या शिबिराचा सांगता समारंभ आमदार बबनराव शिंदे यांच्या उपस्थितीत पार पडला. त्यावेळी डॉ.लहाने यांनी शस्त्रक्रियेनंतर घ्याव्या लागणार्या डोळ्यांच्या काळजीबाबत रुग्णांना मार्गदर्शन केले. या शिबिरासाठी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ नंदकुमार घोळवे कुर्डूवाडी ग्रामीण रूग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक डॉ. गायकवाड त्यांचे कर्मचारी, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ शिवाजी थोरात त्यांचे कर्मचार्यासह माढेश्वरी अर्बन बँकेचे उपाध्यक्ष अशोक लुणावत आदींनी परिश्रम घेतले.पुढील वर्षापर्यंत ९ लाख डोळ्यांच्या शस्त्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून आतापर्यंत २ लाख शस्त्रक्रिया झाल्याचे डॉ लहाने यांनी संकल्प व्यक्त केला.

डॉ तात्याराव लहाने यांचा सत्कार

डॉ तात्याराव लहाने यांचा आज वाढदिवस असल्याने माढा प्रेस क्लब च्या वतीने पत्रकार हिम्मत जाधव यांच्या निवासस्थानी वाढदिवस साजरा करीत यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी डॉ. तात्याराव लहाने यांनी कागदोपत्री माझा वाढदिवस वेगळा असून आज १२ फेब्रुवारी रोजी माझ्या आईने किडनी देऊन मला पुनर्जन्म दिला आहे. यामुळे माझा वाढदिवस आजचा दिवस मानून तो करत आलो असल्याचे पत्रकारांशी सांगितले.

मंगळवेढा नगरपरिषद, मंगळवेढा

ई-निविदा सूचना जा.क्रं.कार्या-2/बांध./210/2022-23 दि.10/02/2023

नगरपरिषद मंगळवेढा यांचेकडून खालिल कामांकरिता बी-1 नमुन्यामध्ये दोन लिफाफा पध्दतीने (ई-निविदा पध्दतीने) अशा कामांचा दिर्घ अनुभव असलेल्या महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत. खालील कामांची निविदा केवळ ई-निविदा पध्दतीने सादर करावयाची आहे. निविदेचा वितृत नमूना महाराष्ट्र शासनाच्या https.//mahatender.gov.in या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) दिनांक:-13/02/2023 पासून उपलब्ध आहे. बयाणा रक्कम व कोरी टेंडर फॉर्म फी नेट बँकिंग पध्दतीने स्विकारली जाईल.

अं.नं.	कामांचे नांव	अंदाजीत रक्कम	बयाणा रक्कम	सुरक्षित ठेव	कामांचा कालावधी	निविदा फी
	प्रशासकीय योजना /न.पा.फंड सन 2022-23					
1	मंगळवेढा नगरपरिषद येथे घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत ओला कचरा शेडमध्ये कंम्पोष्ट पीट बांधणे.	1483418	14900	29800	3 महिने	1500

ई-निविदा दस्तऐवज करण्याचा तपशिल	दस्तऐवज लोड करण्याचा कालावधी
ई-निविदा दस्तऐवज लोड प्रारंभ दिनांक	दिनांक 13/02/2023 सकाळी 11.00 पासून
ई-निविदा दस्तऐवज लोड समाप्त दिनांक	दिनांक 20/02/2023 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत
ई-निविदा दाखल करण्यांची सुरूवात दिनांक	दिनांक 13/02/2023 सकाळी 11.00 पासून
ई-निविदा दाखल करण्यांची अंतिम दिनांक	दिनांक 20/02/2023 सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत
ई-निविदा उघडण्याचा दिनांक	दिनांक 21/02/2023 सकाळी 11.00 पासून

शर्ती व अटी:-

1)प्राप्त निविदापैकी कोणतीही एक अथवा सर्व निविदा कारण न देता नामंजूर करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.तसेच काहीही वाद झाल्यास सर्वाधिकार मुख्याधिकारी यांना असतील.सबब कारणे दिली जाणार नाहीत.

2)सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना बयाणा रक्कम व सुरक्षित रक्कम सुट दिली जाणार नाही.

3)इतर सर्व अटी व शर्ती ई-निविदा पत्रामध्ये (फॉर्मवर)देण्यांत आल्या आहेत.

सही/-
मुख्याधिकारी
मंगळवेढा नगरपरिषद

CMYK

'महावितरण'चा शेतकऱ्यांना 'झटका'

थकबाकीसाठी पूर्वसूचना न देताच रोहित्र बंद; बळीराजा संतप्त

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यात असणाऱ्या तीन लाख ६८ हजार शेतीपंप ग्राहकांच्या कृषिपंपांची पाच हजार ३३० कोटी रूपयाची थकबाकीच्या कारणामुळे वसुलीसाठी ऐन उन्हाळ्याच्या सुरुवातीस थेट रोहित्रांचाच वीज पुरवठा खंडित करण्याचे सत्र गेल्या पाच दिवसांपासून विद्युत वितरण कंपनीने जिल्ह्यात सुरू केले आहे. त्यामुळे अडचणीत असणाऱ्या बळीराजाला ४४० चा झटका बसला आहे.यामुळे ऊस तोडणीचा हंगाम वेग घेत असताना आणि रब्बीच्या पिकांसाठी पाण्याची गरज असताना महावितरणच्या या कारवाईमुळे शेतकरी संतापले आहे.

राज्यात कृषीपंपासाठी सगळ्यात जास्त वीजेचा वापर पुणे प्रादेशिक विभागातील पुणे, सांगली, सातारा, सोलापूर व कोल्हापूर जिल्ह्यात होतो. महागडी चारचाकी वाहन वापरणारे, बंगल्यात राहणारे व नियमित आयकर भरणारे शेतकरी याच जिल्ह्यांमध्ये असूनही वीजबिल मात्र भरत नाहीत. लाखो रुपयांचे उत्पन्न मिळविणारे श्रीमंत शेतकरी या भागात आहेत. पाचही जिल्ह्यात कृषीपंपासाठी विजेचा मोठ्या प्रमाणात वापर होत असून ऊस, फळबागा, भाजीपाला व फुलशेती, यासाठी वीजेचा वापर करणाऱ्या सधन शेतकऱ्यांची संख्याही मोठ्या प्रमाणात आहे, असे निरीक्षण महावितरण'च्या अधिकाऱ्यांनी नोंदवले आहे. त्यामुळे आता वीजबिल न भरणाऱ्यांचा वीजपुरवठा खंडीत केला जात आहे.काही शेतकऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता तर काही शेतकऱ्यांनी सवलत मागूनदेखील कनेक्शन तोडले जात आहे. सरकारकडून कोणताही लेखी आदेश नसताना केवळ वरिष्ठांच्या तोंडी सांगण्यावरून शेतकऱ्यांची उभी पिके जाळण्याचे काम महावितरणकडून केले जात असल्याचे शेतकऱ्यांचे मत आहे. त्यामुळे तात्काळ वीज पुरवठा सुरळीत सुरू करण्याची मागणी होत आहे.

वीजबिलाच्या थकबाकीत 'सवलत शेतकऱ्यांच्या हितासाठी राज्य शासनाने नवीन कृषिपंप धोरण-२०२० तयार केले. त्याअंतर्गत ३१ मार्च २०२३ पर्यंत थकबाकी भरल्यावर एकूण थकबाकीत ३० टक्के सूट दिली जात आहे. तसेच विलंब आकार व व्याज पूर्णतः माफ केले जात आहे. या धोरणाची अंमलबजावणी जानेवारी २०२१ पासून केली जात आहे. जानेवारी २०२१ ते मार्च २०२२ पर्यंत ५० टक्के सूट देण्यात आली होती. पण, आता एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ पर्यंत ३० टक्केच सूट मिळणार आहे.

वीज वापराच्या दुप्पट अनुदान

सरकार शेतीमालाच्या उत्पादन खर्चात वीज बिल धरत नाही. हे सरकारला माहिती आहे म्हणून तर वीज कायदा २००३ च्या कलम ६५ प्रमाणे कृषीपंपधारकांना अनुदान देत आहे. हे अनुदान वीज वापराच्या दुप्पट दिले जाते हे माहिती अधिकारात सिध्द झाले आहे. तसेच जनहित याचिका ५४६/२०१० व ८६५१/२०२० मध्ये निर्णय शेतकऱ्यांच्या बाजूने आहेत. शेतकऱ्यांना वीज कायदा २००३ च्या कलम ५६(१) ची नोटीस द्या, असे आदेश झाले आहेत. तसेच जनहित याचिका ४४/२०१२ मध्ये ७ फेब्रुवारी २०१३ च्या प्रतिज्ञापत्रात वाणिज्य विभाग प्रमुख मु. स. केळे यांनी वीजपुरवठा खंडित करणार नाही, असे सांगितले आहे. तसेच अन्न आयोगानेही वीज पुरवठा खंडित करू नका. आता कोणताही राजकीय पक्ष आपल्या बाजूने राहिला नाही. आता आपले प्रश्न आपणच सोडविले पाहिजे, अशी माहिती शेतकरी संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष पांडुरंग रायते यांनी सांगितले.

बदलत्या शिक्षण पद्धती स्वीकार करणे गरजेचे: कल्याणशेट्टी

सुराज्य/अक्कलकोट : बदलत्या शिक्षण पध्दती स्वीकारून विध्यार्थ्यांनी पुढील वाटचाल करणे काळाची गरज बनली आहे. त्यासाठी सातत्याने परिश्रम करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन कल्याणशेट्टी शाळेचे संचालिका शांभवी कल्याणशेट्टी यांनी केले. त्या वळसंग येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत इयत्ता १० वी चे ११२ विध्यार्थ्यांचे निरोप समारंभात बोलत होते. व्यासपीठावर जिल्हाधिकारी मल्लिनाथ कलशेट्टी, कल्याणशेट्टी शाळेचे संचालिका शांभावी कल्याणशेट्टी, संस्था अध्यक्ष श्रीशैल दुधगी, चेअरमन शिवशरण थलंगे, मुख्याध्यापक वीरेश थलंगे, उपसरपंच रोहिणी फुलारी, परिवेक्षक शिवानंद घोडके, संचालक शिवशरण प्याटी, प्रकाश दुधगी, विश्वनाथ थलंगे, रमेश दुधगी होते. सूत्रसंचालन श्रीमंत भोसले यांनी केले तर आभार नीलकंठ कवटगी यांनी मानले.

भोसले यांना समाजगौरव पुरस्कार

सुराज्य/अक्कलकोट : सोलापूर जिल्हा क्रीडा शिक्षक महासंघ व लोकमंगल कॉलेज वडाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुरस्कार सोहळ्यात समाजगौरव पुरस्कार श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे भोसले यांना जाहीर करण्यात आला होता. त्यांच्यावतीने न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी आमदार सुभाष देशमुख व माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारला.

यावेळी व्यासपीठावर उद्योजक दत्तामामा मुळे, सोसायटी क्रिडा शिक्षक महासंघाचे भारत इंगोले आदी उपस्थित होते.सोलापूर जिल्हा क्रीडा शिक्षक महासंघाचे व लोकमंगल कॉलेजचे अमोलराजे भोसले यांनी आभार मानले. कार्यक्रमास श्रीक्षेत्र अक्कलकोहून राजाभाऊ नवले, विराज माणिकशेट्टी, प्रविण घाटगे उपस्थित होते.

मल्लिकार्जुन मंदिरात शिवरात्रीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

सुराज्य/मोडनिंब : सोलंकरमळा अरण येथील संत हैबतीबाबा सोलंकर यांच्या पावण भुमीत मल्लिकार्जुन महादेव मंदिर सोलंकरमळा येथे शिवरात्रीच्या पवित्र महापर्वानिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले असल्याची माहिती व्यासपीठ चालक नेताजी शिंदे महाराज यांनी दिली. दि. १२ फेब्रुवारी रविवारी हभप सारंग महाराज सुरवसे व समाज कल्याणचे माजी सभापती यांच्या हस्ते कलश पूजनाने रविवारी सप्ताहास सुरुवात करण्यात आली. यावेळी बालाजी टोणपे, मोहन इंगळे, अनंता गलांडे, राजाभाऊ भांगीरे, नानासाहेब सोलंकर, बाबासाहेब सोलंकर, येताळ सोलंकर, लक्ष्मण सोलंकर, हनुमंत सोलंकर, पोपट सोलंकर, हभप नेताजी शिंदे महाराज उपस्थित होते.दैनंदिन सात दिवस भक्तिमय कार्यक्रम आयोजित केले आहेत. या सप्ताहात बळीराम इंगळे, नाना सोलंकर, लक्ष्मण वाघमारे, उपसरपंच वसंत इंगळे, तुकाराम सोलंकर, पोपट सोलंकर, हनुमंत पवार, सर्जेराव सोलंकर, भारत सोलंकर, बाबा सोलंकर, येताळ सोलंकर, संपत्ती सोलंकर, नवनाथ सोलंकर, येताळ सोलंकर, संपत्ती सोलंकर दिनकर सहस्त्रबुध्दे, नागनाथ सोलंकर हे अन्नदान सेवा करणार आहेत. यासाठी मंडप सेवा शरद सावंत हे उपलब्ध करुन देणार आहेत.

एन.एम.एम.एस. परीक्षेत चैतन्य प्रशालेचे यश

सुराज्य/अक्कलकोट : आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या विद्यार्थ्यांकरिता येतली जाणारी राष्ट्रीय स्तरावरील शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षा NMMS (नॅशनल मिन्स कम मेरीट स्कॉलरशिप इयत्ता आठवी) च्या परीक्षेसाठी बसलेल्या एकुण सात विद्यार्थ्यांपैकी महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था, अक्कलकोट संचलित अनंत चैतन्य माध्यमिक प्रशालेच्या दोन विद्यार्थिनी करिश्मा ईलाई जमादार (सुलतानपुर) हिने ७८.३०टक्के व समिक्षा दिगंबर बाबर (गुळहळळी) हिने ७७.२३ टक्के गुण मिळवून शिष्यवृत्ती करिता पात्र ठरल्या. मार्गदर्शन केलेल्या विज्ञान सहशिक्षिका व शिष्यवृत्ती परीक्षा विभाग प्रमुख स्वप्नाली जमदाडे, सहशिक्षिका मल्लुप्पा चप्पळगाव, सहशिक्षक विश्वनाथ चव्हाण, शहाजी माने यांचे सर्वांनी अभिनंदन केले.

शेतकरी उत्पादन कंपनी काळाची गरज : मुकणे

भंडारकठे सीना भीमा शेतकरी उत्पादन कंपनीचे उद्घाटन

सुराज्य/दक्षिण सोलापूर

सोलापूर जिल्ह्यातील अनेक शेतकरी एकत्र येऊन शेतकरी उत्पादन कंपनी स्थापन केली पाहिजे. या कंपनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव मिळेल. शेतकरी ते ग्राहक विक्री झाल्याने शेतकऱ्यांना दोन पैसे जास्त मिळतात, असे प्रतिपादन आत्मा प्रकल्प संचालक मदन मुकणे यांनी केले.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे गावातील शेतकऱ्यांनी एकत्र मिळून भीमासिना शेतकरी उत्पादन कंपनी भंडारकवठे या कार्यालयाचे उद्घाटन व शेतकरी मार्गदर्शन मेळाव्याच्या आयोजन करण्यात आले होते.त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला सरपंच चिदानंद कोटगोडे, तालुका कृषी अधिकारी रामचंद्र माळी, चेअरमन नबीसाब बारूदवाले, पंचायत समिती सदस्य एम.डी. कमळे,विठ्ठल पाटील, विजय पाटील, सोसायटीचे चेअरमन गोपाळ जंगलगी, लक्ष्मीताई विरदे, शशिकांत कोळी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मदन मुकणे बोलताना म्हणाले की, 'सोलापूर जिल्ह्यातील अनेक शेतकरी उत्पादन कंपनी स्थापन केली आहेत परंतु, अनेक कंपन्या ह्या बंद अवस्थेत आहेत काही बोटावर मोजण्या इतकेच कंपन्या चालू असून त्या कंपनीची उलाढाल मोठ्या प्रमाणात आहे. या कंपनीच्या माध्यमातून थेट देश-विदेशात शेतकऱ्यांचा माल थेट विक्री करता येईल. यामुळे शेतकऱ्यांना दोन पैसे मिळवून शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती वाढेल सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन गट स्थापन करण्यासाठी सोलापूर जिल्ह्यात आत्मा अंतर्गत अनेक तालुक्यांमध्ये मार्गदर्शन शिबिर मेळावा यांचे आयोजन करण्यात येते. परंतु सोलापूर जिल्ह्यात फक्त दोनशे शेतकरी उत्पादक कंपनी असून फक्त २५ शेतकरी कंपन्या कार्यरत आहेत. पूर जिल्ह्यातील शेतकरी उत्पादन कंपनीने कंपनीच्या माध्यमातून अवजार बँक काढून शेतकऱ्यांना कमी दरात शेती अवजारे भाड्याने दिली तर शेतकऱ्यांना सुद्धा फायदा होईल तसेच कंपनीला सुद्धा आर्थिक उत्पन्नात वाढ होईल. अशा नवनवीन संकल्पना कंपनीने राबाव्यात.

यावेळी भंडारकवठे येथील शेतकरी महासिध्द पुजारी यांना भीमासिना शेतकरी उत्पादन कंपनीचे शेअर्स मदन मुकणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या कार्यक्रमाला बापूराव पाटील, भीमाशंकर बबलेश्वर, सिध्दाराम बिराजदार, रामचंद्र कुलकर्णी, सिध्देश्वर धोत्रे, गुरुनाथ आरकेरी, सुधाकर होनकोरे, मल्लिनाथ कुगने, सुधीर कुलकर्णी, सोमनिंग बिराजदार, सिध्देश्वर धोत्रे, सोमनिंग कमळे, संगप्पा बिराजदार, चिदानंद विरदे, प्रशांत कदम, नवनाथ बुधाळे उपस्थित होते.

कॅनॉलची दुरुस्ती होऊन आवर्तन सोडण्यात यावे : पवार

सुराज्य/मोहोळ

पाटकुल येथील फुटलेल्या कॅनॉलची दुरुस्ती होऊन तातडीने आवर्तन सोडण्यात यावे अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष राजेश पवार यांनी दिला आहे.

अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे पाटकूल येथे उजनी कॅनॉल फुटून शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. पिके पाण्याच्या प्रवाहामुळे वाहून गेली आहेत. त्या फुटलेल्या कॅनॉलची अद्याप दुरस्ती झालेली नाही. याचे काम धिम्या गतीने सुरु आहे हे काम जलदगतीने करून उरलेली फिके तरी पाणी सोडून शेतकऱ्यांना पाणी वेळेत मिळाली तर ती जगवता येतील अन्यथा तीही जळून जातील व त्यामुळे आणखीनच शेतकऱ्यांचे नुकसान होईल ते टाळण्यासाठी तातडीने फुटलेल्या कॅनॉलची दुरुस्ती होऊन तातडीने पाणी सोडण्यात यावे असा इशारा काँग्रेसचे (आय) चे जिल्हा उपाध्यक्ष राजेश पवार यांनी दिला आहे अन्यथा शेतकऱ्यांचे पिकाचे पुढील नुकसान टाळण्यासाठी आंदोलन करावे लागेल, असा इशाराही राजेश पवार यांनी दिला आहे.

घरातून अडीच लाखांचे दागिने पळविले; पती-पत्नीविरुद्ध गुन्हा

सुराज्य/वैराग : ओळखीतून घरात आलेल्या दांपत्याने एका महिलेच्या घरातून २ लाख ४० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने पळविले. ही वैराग (ता. बार्शी) येथील संजय नगरात शनिवारी दुपारच्या सुमारास घडली.

या प्रकरणात वैरागच्या पोलिसांनी दोयांना अटक केली. या संदर्भात काजल अनिल ढाळे (रा. संजय नगर, वैराग) यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. काल दुपारी तीन वाजेच्या सुमारास त्या घरातील कपाट उघडून साहित्याची आवराआवर करीत होत्या. त्यावेळी त्यांच्या परिचयातील रेखा नंदू काळे आणि तिचा पती नंदू भारत काळे (रा. देगाव, ता. मोहोळ) हे अचानक त्यांच्या घरी आले आणि बोलत असताना दोयांनी नकळत त्यांच्या कपाटा जवळील ४८ ग्रॅम सोन्याचे दागिने घेऊन पसार झाले होते. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर काजल ढाळे यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी दोयांना अटक केली. पुढील तपास हवालदार आलात हे करीत आहेत.

जागेच्या कारणावरून कोयत्याने मारहाण; तिघे जखमी

सुराज्य/पंढरपूर : घरासमोरील भावकीतील जागेत बांधकाम करीत असताना झालेल्या तक्रारीवरून कोयता काठी आणि हाताने केलेल्या मारहाणी एकाच घरातील तिघेजण जखमी झाले. ही घटना गुरसाळे (ता. पंढरपूर) येथे शनिवारी दुपारच्या सुमारास घडली. हरिदास गणपत निंबाळकर (वय ६०) त्यांचा मुलगा अक्षय आणि पत्नी विजया निंबाळकर अशी जखमींची नावे आहेत. या प्रकरणात हरिदास निंबाळकर यांनी पंढरपूर तालुका पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी जखमीचे भाऊ लक्ष्मण गणपत निंबाळकर, त्याचा मुलगा अंकुश, श्रवण निंबाळकर आणि दीपा अंकुश निंबाळकर (सर्व रा. गुरसाळे) अशा चौयाविरुद्ध गुन्हा दाखल केला.

शनिवारी दुपारी १२ वाजेच्या सुमारास हरिदास निंबाळकर हे शेताच्या शेजारील ग्रामपंचायतने दिलेल्या जागेत कंपाउंड साठी खड्डे मारत होते. त्यावेळी आरोपीने या ठिकाणी खड्डे पाडायचे नाही. ही जागा आमची आहे. असे म्हणत ऊस तोडण्याचा कोयता, काठी आणि हाताने मारहाण केली. अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार क्षीरसागर पुढील तपास करीत आहेत .

ट्रॅक्टरच्या ट्रॉलीतून पडून मजूर ठार; चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

सुराज्य/पंढरपूर : सोलापूर-वेगाने जाणाऱ्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीतून खाली पडल्याने मजूर जागीच ठार झाला. हा अपघात खर्डी ता. पंढरपूर येथील संगम हॉटेल जवळ शनिवारी सकाळच्या सुमारास घडला. बालाजी बाबूराव येडे (वय ४० रा. आंबेजोगाई, जि. बीड) असे मयत झालेल्या ऊस तोड मजुराचे नाव आहे.

काल सकाळी ९ वाजेच्या सुमारास कांही मजूर एमएच२५-एच-३७३३ या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीत बसून सांगोला ते पंढरपूर असा प्रवास करीत होते. त्यावेळी बालाजी येळे हा ट्रॅक्टरच्या ट्रॉलीतून खाली पडला आणि ट्रॉलीचे चाल डोक्यावरून गेल्याने तो जागीच मयत झाला. या अपघाताची फिर्याद मयताचे नातेवाईक आनंद दोडके (रा. आंबेजोगाई) यांनी पंढरपूर तालुका पोलिसात दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी ट्रॅक्टरचा चालक सज्जाद सत्तार शेख (रा. केज, जि. बीड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. हवालदार हेंबाडे पुढील तपास करीत आहेत.

दुधनीतील मालमत्ताधारकांनो कराचा भरणा करा : वाळुज

सुराज्य/अक्कलकोट : दुधनी नगरपरिषद हद्दीतील थकित मालमत्ताधारकांनी आपले थकित कर त्वरित नगरपरिषदेकडे भरणा करुन प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन दुधनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अतिष वाळुंज यांनी केले आहे.

दुधनी शहरातील सर्व मालमत्ता धारक, भोगवटदार, भाडेकरू व नगरपालिका मालमत्तातील भोगवटदार, भाडेकरू यांना आवाहन करण्यात येते की, आपल्या मालकीच्या, भोगवट्यातील मालमत्तांचे मालमत्ता कर, पाणीपट्टी, गाळा भाडे, जागा भाडे भरण्या बाबत नोटीसा दिल्या आहेत. काही मालमत्ताधारकांनी अजूनही करभरणा केला नाही. तरी नगरपरिषदेकडे त्वरित कर भरणा करुन सहकार्य करावे. अन्यथा बड्या थकबाकीदारांची नावे स्थानिक वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर प्रसिध्द केली जाणार आहेत. काही मालमत्ताधारकांनी अनेक वर्षे कर भरणा न केल्याने मोठ्याप्रमाणात कर थकबाकी राहिली आहे.

शहरात मुलभूत नागरी सोयी-सुविधा पुरविण्यासाठी शंभर टक्के कर वसुली होणे गरजेचे आहे. तरी मालमत्ताधारकांनी प्रसंगी होणारी जप्तीची कारवाई टाळण्यासाठी कराचा भरणा करावा. कर वसुलीसाठी आपल्याकडे येणाऱ्या नगरपरिषद कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे.

तर काही मालमत्ताधारकांनी कर थकित ठेवले आहेत.तरी लवकरात लवकर थकित कर भरुन प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन मुख्याधिकारी अतिष वाळुज यांनी केले आहे. येत्या मार्च अखेर पर्यंत सर्व मालमत्ता कर भरण्याचे आवाहन मुख्याधिकारी अतिष वाळुंज यांनी केले आहे.

निधन वार्ता

मालन मुंगुसकर

सुराज्य/वेळापूर : वेळापूर मुंगुस्करवस्ती ता. माळशिरस येथील मालन भानुदास मुंगूसकर यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, चार मुले, दोन मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्या ग्रामविकास अधिकारी सुधाकर मुंगूसकर यांच्या मातोश्री होत.

मल्लिकार्जुन तेलगांव

सुराज्य/तडवळ : तडवळ येथील राहत्या घरी मल्लिकार्जुन तेलगांव यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नांतवंडे असा परिवार आहे. राष्ट्रीय गुरव महासंघाचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकरणी सदस्य बसवराज तेलगाव यांचे ते वडील होत.

अमित पाटील

सुराज्य/सोलापूर : भगवती नगर सम्राट चौक येथील अमित सुभाष पाटील (वय ४७) यांचे निधन झाले. ते एम्प्लॉयमेंट चौक येथील हाऊस ऑफ नोकियाचे मालक होते. त्याच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, आई - वडील असा मोठा परिवार आहे.

भारत विश्व गुरुत्वाचे काम करेल: प्रा. वरखेडी

सुराज्य/पुणे

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जी-२० चे नेतृत्व करून भारताची ताकद जगाला दाखवून दिली आहे. त्याचप्रमाणे ही जागतिक पातळीवरील परिषद आगामी काळात जागतिक महत्त्वाची कामे करणार आहे. भारत हे आध्यात्मिक राष्ट्र आहे. जागतिक भावनेने विद्यार्थ्यांना आता शांततेच्या दिशेने वाटचाल करायची आहे, असे मत केंद्रीय संस्कृत विद्यापीठ, नवी दिल्लीचे कुलगुरू प्रा. श्रीनिवास वरखेडी यांनी मांडले.

मार्इर्स एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे यांनी त्र्यंबकेश्वर हॉल, काशी विश्वनाथ धाम कॉरिडॉर येथे ज्ञान, विज्ञान, अध्यात्म या तीन दिवसीय ९व्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी वाराणसी काशी विश्वनाथ कॉरिडॉरचे सीईओ सुनील कुमार वर्मा, हरे राम त्रिपाठी, मार्इर्स एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ कराड, डॉ. योगेंद्र मिश्रा, डॉ. प्रियांकर उपाध्याय, डॉ.संजय उपाध्ये व एमआयटीचे डब्ल्यूपीयूचे प्र. कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे.

डॉ. श्रीनिवास वरखेडी पुढे म्हणाले, 'सध्याच्या युगात देशातील सर्व विद्यापीठे ज्ञाननिर्मितीत गुंतलेली आहेत. विद्यार्थ्यांना साक्षर करणे. पण त्यातून साक्षरतेबरोबर राक्षसही निर्माण होत आहेत. साक्षर राक्षस. अशा वेळी आपण जगाला काय द्यायचे असा प्रश्न पडतो. काशी हे संस्कृतचे निवासस्थान आहे. येथून विश्वशांतीचा प्रतिध्वनी होत आहे. माणसाला सुख आणि शांती हवी असते. त्या दृष्टीने ही परिषद महत्त्वाची आहे.

यावेळी संपूर्णानंद संस्कृत विद्यापीठाच्यावतीने विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथ कराड यांना संस्कृत श्री सन्मान प्रदान करण्यात आला आहे.

सुनील कुमार वर्मा म्हणाले, 'ज्या दिवशी राष्ट्रीय आणि वैयक्तिक चारित्र्य ठरवले जाईल, त्या दिवशी देशात शांततेची भावना आपोआप जागृत होईल. आपल्या पूर्वजांच्या विचारातूनच राष्ट्रीय विचार निर्माण झाला आहे. या संमेलनामुळे काशीला एक नवीन ऊर्जा मिळाली आहे.

हरे राम त्रिपाठी म्हणाले, डॉ. कराड जागतिक शांततेच्या उत्क्रांतीचे कार्य करीत आहेत. मानवतेमध्ये शांतता प्रस्थापित करणे हा त्यांचा उद्देश आहे. भारतीय संस्कृती प्रवाहित असून ती जगासमोर आणण्याचे काम ते करत आहेत.

प्रा. डॉ. विश्वनाथ कराड म्हणाले, 'ज्ञानाच्या रथावर स्वार होणारा भारत आहे. अशा स्थितीत काशी विश्वनाथ कॉरिडॉरमधील शांतता परिषदेत जे घडले, त्यावरून आम्ही संपूर्ण जगात शांतता प्रस्थापित करण्याचे काम करू. भारत हा एकमेव देश आहे जो संपूर्ण जगाला सुख, समाधान आणि शांतीचा मार्ग दाखवेल.

डॉ. योगेंद्र मिश्रा म्हणाले, 'काशीमध्ये डॉ.कराड यांना विश्वशांती विद्यारत्न पुरस्कार मिळाल्याचा इतिहास घडला आहे. १५ फेब्रुवारीला जागतिक हिंदी संमेलनात काशीचा संदेश जगभर दिला जाणार आहे.

डॉ. संजय उपाध्ये म्हणाले, 'जगात आणखी एक युद्ध सुरू आहे, अशा वेळी शांततेबाबत मनात भीती निर्माण होत आहे. परंतु येथे उठणाऱ्या चर्चेच्या लाटांमुळे सर्वांचे मन शांत होईल, हे सर्व मानवांसाठी चांगले लक्षण आहे.'

यावेळी काशीतील सर्व वृत्तपत्रांच्या ज्येष्ठ पत्रकारांचा सत्कार डॉ. विश्वनाथ कराड आणि डॉ. मिलिंद पांडे यांच्या हस्ते करण्यात आला. प्रा. डॉ. मिलिंद पात्रे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मिलिंद पांडे यांनी सर्वांचे आभार मानले.

सुगंधी लाल द्राक्षाचे 'नवे वाण' विकसित

द्राक्ष बागाईतदार संघास यश; निर्यातक्षम द्राक्ष उत्पादनात होणार वाढ

✔ सुराज्य/शिवाजी हळणवार

महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाने मांजरी येथील प्रयोगशाळेच्या प्रक्षेत्रावर सुगंधी लाल रंगाच्या द्राक्षाचे नवे वाण विकसित केले आहे. या लाल रंग असलेल्या वाणाचा स्वत:चाच एक सुगंध आहे. रंग, चव, वजन आणि टिकाऊपणाच्या बाबतही हे वाण दर्जेदार आहे.

मांजरी येथील प्रक्षेत्रावर या वाणाची चाळीस झाडे आहेत. गेल्या तीन-चार वर्षांपासून या वाणाच्या संशोधनाचे काम सुरू होते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मागणी लक्षात येऊन उत्कृष्ट रंग, उत्कृष्ट चव, चांगली वजनदार आणि सुवासिक द्राक्ष प्रजाती विकसित करण्यात द्राक्ष बागाईतदार संघास यश आले आहे.

महाराष्ट्राच्या विविध भागांत, वेगवेगळ्या भौगोलिक आणि वातावरणात या वाणाची चाचणी व्हावी या उद्देशाने मांजरी फार्म येथील प्रयोगशाळेसोबतच बागाईतदार संघाच्या काही प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रयोगासाठी सदर वाणाची काही झाडे देण्यात आली होती. भारत शिंदे (अध्यक्ष, पुणे विभाग), अभिषेक कांचन (उरुळी कांचन) आणि अशोक गायकवाड (नाशिक) यांनी या नव्या वाणाची चाचणी घेतली आहे. त्यांच्याकडून वाणाबाबत समाधानकारक अभिप्राय प्राप्त झाले आहेत. या चाचणीदरम्यान प्राप्त झालेल्या अभिप्राय आणि सूचनांचा अभ्यास करून या वाणात अजून काही सुधारणांची शक्यताही तपासली जाणार आहे.

महाराष्ट्रातील द्राक्षांना जगभरातून मागणी असते. तरीही महाराष्ट्रातील एकूण द्राक्ष उत्पादनांपैकी फक्त आठ टक्के माल निर्यात होतो. सुधारित वाणांच्या वापराने निर्यातक्षम द्राक्ष उत्पादनात भरघोस वाढ होईल. नव्याने विकसित करण्यात आलेले वाण सध्याच्या क्रीमसन जातीपेक्षाही सुधारित आहे. हे वाण दर्जेदार असल्यामुळे आंतरराष्ट्रीय आणि स्थानिक बाजारपेठेत चांगली मागणी राहील. तळेगाव वणी (जि. नाशिक) येथील प्रक्षेत्रावर सुमारे एक हजार झाडांचा मळा उभारण्यात आला आहे. पुढील हंगामात ही द्राक्षे शेतकऱ्यांना पाहण्यासाठी उपलब्ध होतील.

–शिवाजीराव पवार
(अध्यक्ष,महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघ)

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मागणीनुसार चांगल्या रंग, चव, वजनाची आणि सुवासिक द्राक्ष प्रजात द्राक्ष बागाईतदार संघाने विकसित केली आहे. गेल्या चार वर्षांपासून सुरू असलेल्या संशोधनाला यश प्राप्त झाले आहे. या प्रजातीचे नामकरण करून लवकरच द्राक्ष बागाईतदारांना उपलब्ध करून देण्यात येईल.

–चंद्रकांत लांडगे
(अध्यक्ष, विज्ञान समिती)

कुर्डुवाडीत सकल जैन समाजाचे विधान कार्यक्रम

✔ **कुर्डुवाडी** : कुर्डूवाडी येथे जैन मुनी उत्तमसागर महारज व पुराण सागर महाराज यांच्या सानिध्यात भव्य विधान कार्यक्रम संपन्न झाला. आ. बबनराव शिंदे, आ. संजयमामा शिंदे, धनराज शिंदे, डॉ.तात्यासाहेब लहाने आदी मान्यवरांनी जैन मुनींचे आशीर्वाद येतले.या वेळी जैन समजा कडून त्यांचा सन्मान करण्यात आला. राजेश गांधी व महेश गांधी, गांधी परिवार व सकल जैन समजा कडून १० फेब्रवारी ते १२ फेब्रवारी असा तीन दिवस या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या निमित स्नेह भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. तीन दिवस चाललेल्या पूजा विधी मध्ये पंचपरमेष्टी विधान, णमोकार पैंतीसी, १००८ शांतीनाथ विधान संपन्न झाले. अभिषेक, आरती, प्रवचन, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते शहर व परिसरातील जैन बांधवानी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभाग येतला.

बेलाटी येथे पशुसंवर्धन शिबिर

✔ **उत्तर सोलापूर** : पशुवैद्कीय दवाखाना तिर्हे व फुलटर्न इंडिया ग्रामशक्ती लि. यांच्या संयुक्त विद्यमाने जनावरांसाठी व पशू पालकांनी जनावरांची घ्यावयाची काळजी शिबिर येण्यात आले. सरपंच शिवनेरी पाटील यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त सोलापूर डॉ. बी. जे.पराडे, ज्ञानेश्वर गिरी, तिर्हेचे पशूधन डॉ.कदम, देगावचे डॉ.बनगर, एकनाथ ढवळे,दत्तात्रय चाबुकस्वार, चंदन पाटील, शिवाजी कोतले उपस्थित होते. डॉ. डी. बी.कदम यांनी पशू विभागाच्या विविध योजना बद्दल माहिती दिली.व मार्गदर्शन केले. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. पराडे यांनी पशुची तपासणी करून पशूपालकांना माहिती दिली. आवश्यक असणारी खानिज, जंतनाशक औषधे, शक्तीवर्धक औषधे वाटप करण्यात आले.

जहागिरदार यांच्या स्मृतीला पिलीव येथे अभिवादन

✔ **पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव भागाचे नेते स्व.अजितसिंह बाळासाहेब जहागिरदार यांच्या पुण्यतिथी निमित्त विजय नागरी सहकारी पतसंस्था पिलीव येथे अभिवादन करण्यात आले. यानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती संग्रामसिंह जहागिरदार, माजी जि.प. सदस्य गणेश पाटील, पिलीवचे सरपंच नितीन मोहीते, ॲड. मानसिंह जहागिरदार, रामचंद्र कोळी, अविनाश जेऊरकर, विजयसिंग रजपूत, नानासाहेब मदने, सचिन मदने, मोहसीन शेख, उमेश देशमुख, रघुनाथ देवकर, प्रमोद भैस, शाहरुख मुलाणी, रतनसिंग भैस, तानाजी लोखंडे यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. ॲड. मानसिंह जहागिरदार, रघुनाथ देवकर यांनी स्व.अजितसिंह जहागीरदार यांच्या कार्याला उजाळा देत आपले विचार व्यक्त केले.

शिव – आरोग्य शिबीरात १६८ रुग्णांची नेत्रतपासणी

✔ **पिलीव** : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे युवा सेनेच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या शिव - आरोग्य शिबीरात १६८ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. दरम्यान अगोदर या शिव - आरोग्य शिबीराचे उद्घाटन शिवसेना प्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे शिवसेनेचे माळशिरस तालुका प्रमुख संतोष राऊत, युवा सेना सोलापूर जिल्हा प्रमुख गणेश इंगळे, युवासेना सहसचिव स्वप्नील वायमारे, शिवसेनेचे माजी जिल्हा उपप्रमुख अशोक घोंगडे, युवा सेना तालुका प्रमुख सुभाष काकडे, युवा सेना तालुका उप प्रमुख डाक्टर निलेश कांबळे, दत्ता साळुंखे, दुर्वा आडके,शिवसेना अकलुज शहर प्रमुख अनिल बंदपटटे, अकलूज युवा सेना शहर प्रमुख शेखर खिंलारे, दादासाहेब मदने, पिलीवचे माजी सरपंच अमोल मदने, प्रा. शंकर शिंदे, संदीप कदम, योगेश देशमुख, मारुती कांबळे, सचिन माने, मंगेश लोखंडे, अजित शिंदे, दिलीप देशमुख या मान्यवरांचा उपस्थितीत करण्यात आले. या शिबीरात १६८ रुग्णांची नेत्रतपासणी करणयात आली. अल्प दरात चष्म्यांचे वाटप करण्यात आले. तसेच मोतीबिंदू व इतर डोळयाच्या आजारावर उपचार करण्यात येणार आहेत.

लोकमंगलच्या पुरस्कारांचे वितरण

✔ सुराज्य/उत्तर सोलापूर

महाराष्ट्र राज्य क्रीडा शिक्षक महासंघ संलग्न सोलापूर जिल्हा क्रीडा शिक्षक महासंघ व श्रीराम ग्रामीण संशोधन विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर जिल्ह्यातील नामवंत शाळा, क्रीडा शिक्षक, क्रीडा रत्न, समाज गौरव, पत्रकार व उद्योजकाना माजी शिक्षक आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते रुपेश जाधव, अनिता ढोबळे, रुपाली कुलकर्णी यांच्या उपस्थितीत वडाळा येथील लोकंगल शिक्षण संकुल मध्ये करण्यात आला.

समाज गौरव - जन्मेजयराजे भोसले, आदर्श पत्रकार - अरुण बारस्कर, युवा उद्योजक- दत्तात्रेय मामा मुळे, युथ आयकॉन- प्रार्थना ठोंबरे, आदर्श क्रीडा रत्न पुरस्कार -प्रशांत नामदेव यादव, शहाजी काकासाहेब यादगे, ईश्वर बापूराव तोरडमल, संजय कृष्णा झंजे, बाळासाहेब हरिपंत वटारकर, कैलास चुनीलाल कोकणी, प्रकाश दशरथ सोनटक्के, समीर मदनलाल वायकुळे, दिगंबर सुभाष पाटील, नागनाथ बसवंत धनाळे, भरत किसन मेकाले, श्रीकांत अशोक सावंत. आदर्श क्रीडा शिक्षक- अण्णा गुंड, दत्तात्रय हनमंतराव हिळळी, बाळासाहेब श्रीरंग शिंदे, शहाजी मारुती ढोबळे, जवाहरलाल शेतकी हायस्कूल मंगळवेढा, शांतीलाल वसंतराव मोरे, मुकुंद भागवत साळुंखे, हेमंत कुमार बसवेश्वर गाढवे, भरत भीमराव वलगुडे, शिवानंद मल्लिकार्जुन जोकारे, बंडू प्रल्हाद अवताडे, पवन राजेश भोसले.

आदर्श शाळा-ब्रम्हगायत्री विद्या मंदिर रानमसले, खेड भोसे विद्यालय खेड, चंद्रशेखर आगाशे विद्यालय श्रीपुर, महाराष्ट्र विद्यालय बार्शी तालुका बार्शी, चिंचोली माध्यमिक विद्यालय चिंचोली तालुका सांगोला, जीवन ज्योत माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला कंदलगाव तालुका दक्षिण सोलापूर. शिवचलेश्वर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज मैंदर्गी तालुका अक्कलकोट. कै शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नगर तालुका. मोहोळ आदर्श पब्लिक स्कूल कुर्डवाडी तालुका माढा, श्री बाळकृष्ण विद्यालय नंदेश्वर तालुका मंगळवेढा, श्री गिरधरदास देवी विद्यालय करमाळा तालुका करमाळा, संभाजीराव शिंदे प्रशाला विडी घरकुल सोलापूर.

प्रास्ताविक विलास आदामिले व भारत इंगवले, सूत्रसंचालन प्रा प्रचेत बागेवाडीकर, आभार प्रदर्शन लोकमंगल क्रीडा संचालक प्रा गोकुळ यादव यांनी मानले.

सद्गुरूचे कालीचरण सोलंकर कामगार केसरी तर आरु खांडेकर कुमार केसरीचे मानकरी

✔ सुराज्य/पिलीव

महाराष्ट्र राज्य कामगार कल्याण मंडळाच्या वतीने दरवर्षी घेण्यात येत असलेल्या महाराष्ट्र कामगार केसरी व कुमार केसरी कुस्ती स्पर्धा राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा मुंबई या ठिकाणी पार पडली. यामध्ये सद्गुरु श्री श्री साखर कारखाना राजेवाडीचे कामगार मल्ल कालीचरण सोलंकर यांनी कामगार केसरी व आरु खांडेकर यांनी कुमार केसरी कुस्ती जिंकून प्रथम क्रमांकाचा मान मिळवला.

सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्याबरोबरच महाराष्ट्राची मान उंचावून सद्गुरु कारखान्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

सुरेश खाडे यांचे हस्ते गदा, स्मृती चिन्ह, प्रशस्तीपत्र देऊन या मल्लांना सन्मानीत करण्यात आले. या यशस्वी कामगार मल्लांना प्रोत्साहन देऊन त्यांचे मनोबल वाढविणारे सद्गुरु श्री श्री कारखान्याचे चेअरमन एन शेषागिरी राव, व्हा. चेअरमन बाळासाहेब कर्णवर पाटील, सी एफ ओ रोहीत नारा व सर्व संचालक यांनी विजयी मल्लांचा सन्मान केला. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे कामगार केसरी हा किताब सलग पाचव्या वर्षी सद्गुरुच्या शिरपेचात रोवल्याचा आनंद पुर्ण पश्चिम महाराष्ट्रात होत आहे.

याकामी यशस्वी कामगार मल्लांना सि .इ. ओ. आण्णासाहेब शेंडे, जनरल मॅनेजर रामाराव, सचिन खटके, महादेव ठवरे, अमोल मदने, मोहन मदन, दिलीप शेंबडे, खांडेकर, बडरे, दगडे या सर्वांचे, सहकार्य लाभले.

श्रीमंत कोकाटे यांचे कुर्डवाडी येथे व्याख्यान

कुर्डुवाडी : महाराष्ट्रातील ख्यातनाम वक्ते डॉ. श्रीमंत कोकाटे यांचे बुधवारी १५ फेब्रुवारी रोजी नगरपालिका हायस्कूल कुर्डुवाडी येथे व्याख्यान आयोजीत करण्यात आले आहे. मुख्याध्यापक हरिदास सोनवणे यांनी या प्रबोधनपर व्याख्यानाचा लाभ सर्वांनी घेण्याचे आवाहन केले आहे .

मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त सांगोल्यात २२१ जणांचे रक्तदान

✔ सुराज्य/सांगोला

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या ६० व्या वाढदिवसानिमित्त आ. शहाजीबापू पाटील संपर्क कार्यालय करीम कॉम्प्लेक्स, मिरज रोड, रेल्वे गेट जवळ, सांगोला येथे आयोजित रक्तदान शिबिरामध्ये २२१ जणांनी रक्तदान केले.

त्याचबरोबर मोफत नेत्र तपासणी शिबिरामध्ये सांगोला शहर व तालुक्यातील २०० नागरिकांनी सदर शिबिराचा लाभ घेतला. ५० नागरिकांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले. तसेच १५ नागरिकांचे मोतीबिंदू ऑपरेशन करण्यात आले. त्याचबरोबर सकाळी १० वाजता मूकबधिर शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आला. सकाळी ११ वाजता ग्रामीण रुग्णालय सांगोला येथे रुग्णालयातील रुग्णांना फळे वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्याचबरोबर दुपारी १२.०० वाजता मातोश्री वृद्धाश्रम येथे तर दुपारी १.०० वाजता इंदिरानगर झोपडपट्टी सांगोला येथे स्नेहभजनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी आम. शहाजी बापू पाटील, सोलापूर जिल्हा युवासेना संपर्कप्रमुख सागरभैय्या पाटील, बाळासाहेबांची शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, युवा सेना तालुकाप्रमुख गुंडादादा खटकाळे, संजय देशमुख सर, जगदीश पाटील, ड. बंडू काशीद, अभिजीत नलवडे, मा. नगरसेवक सोमेश्वर यावलकर, आनंद काका घोंगडे, सचिन काळे, धनंजय काळे, नितीन चव्हाण, धीरज पवार, अजय सरगर, कुमार मेटकरी विशाल चव्हाण, दादासाहेब खरात, समीर पाटील, जगदीश पाटील, महेंद्र बाजारे, श्रीनिवास (दादा) करे, गणेश कदम, गणेश भोसले, विलास यादगे, उपस्थित होते.

वेळापूर ग्रामपंचायत येथे आढावा बैठक

✔ सुराज्य/वेळापूर

वेळापूर ग्रामपंचायत येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर यांच्या उपस्थितीत व वेळापूर ग्रामपंचायत सरपंच रजनीश बनसोडे आणि उपसरपंच तानाजी चव्हाण व ग्रामपंचायतीचे सर्व विभागाचे कर्मचारी, पदाधिकारी यांची संयुक्त बैठक संपन्न झाली.

यावेळी उत्तमराव जानकर यांनी वेळापूर ग्रामपंचायतची गावाची वसुली विभाग, पाणीपुरवठा विभाग, स्वच्छता विभाग, बाजार तळाच्या समस्या अडचणी व त्यावर करावयाची कामे, जन्म मृत्यू सह विवाह नोंदणी यासह विविध दाखले यांची नोंदी ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत तसेच पानपट्टी, घरपट्टी ऑनलाइन पध्दतीने वसुली करण्याबाबत, घरकुलाचा लाभार्थी एकही वंचित राहणार नाही त्याचबरोबर ग्रामपंचायत मध्ये येणाऱ्या कोणत्याही नागरिकाला विना अडचण त्याचे काम वेळेत मार्गी लावावे अशा अनेक विषयावरती उत्तमराव जानकर यांनी ग्रामपंचायत पदाधिकारी व कर्मचारी यांना सखोल चर्चा करून सूचना दिल्या व विविध विषयावर मार्गदर्शन केले.

या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच तानाजी चव्हाण, रिपाई आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, तंटामुक्ती समिती अध्यक्ष युवराज मंडले, ग्रामपंचायत सदस्य हनुमंत वायदंडे, नानासो मुंगुरकर सीमा खाडे, विमल जाधव, अंजना माने, पांडू साठे, तसेच संजय देशपांडे, विनायक माने, आप्पा कांबळे, जवान माने देशमुख, चंद्रकांत पोळ, उमेश भानवसे, रायचंद खाडे, दादा तुपे, बंडू घोरपडे, दादा मदडे, अमोल चव्हाण यांच्यासह नागरिक, कार्यकर्ते उपस्थित होते.

सुराज्य Classified सोलापूर

नोकरी विषयक

शेतात वस्तीवर राहून नर्सरी व गायींचे काम करणारे जोडपे पाहिजे. पगार १७००० महिना. दोन लाख वर्षाला. ९९२२००४२४२ गिरमे अकलूज.(१३०३२३)

विवाह विषयक

सर्व जातीधर्मातील प्रथम वधुवर, विधवा, घटस्फोटीत आंतरजातीय उच्च शिक्षित भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा. लग्न जुळेपर्यंत स्थळे उपलब्ध करून दिले जातील. श्री तुळजाभवानी वधू-वर सूचक केंद, तुळजापूर
संपर्क : **9763624364, 7410553871** (030323)

वेळापूर येथे उड्डाणपुलाला नाव देण्याच्या कारणावरुन दोन गटांमध्ये वाद

✔ सुराज्य/वेळापूर

वेळापूर तालुका माळशिरस येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मैदाना जवळ सुरू असलेल्या पालखी मार्गातील कामाच्या उड्डाणपुलाला बॅनर लावून नाव देण्याच्या कारणावरून दोन समाजातील गटांमध्ये वातावरण गरम होऊन तणाव निर्माण झाल्याने वेळापूर पोलिसांनी यामध्ये हस्तक्षेप करून दोन्ही समाजातील गटावर गुरुवार रोजी रात्री उशिरा गुन्हे दाखल केले आहेत.

अधिक माहिती अशी की, वेळापूर मधील पालखी चौकात पालखी मार्गावर उड्डाणपुलाचे काम सुरू आहे. तेथे अवताडे कंट्रक्शन कंपनीच्या वतीने उड्डाणपुलावर लांब कॉलम बसवण्याचे काम गेली अनेक दिवसांपासून सुरू आहे मात्र ९ फेब्रुवारी२०२३ रोजी उड्डाणपुलावर लांब कॉलम दोन क्रेनने वर घेत असताना एकाच उडाणपूलाला दोन समाजातील गटांनी वेगवेगळ्या नावाचे बॅनर लावल्याने दोन्ही बाजूने, दोन्ही समाजातील जमाव मोठ्या प्रमाणात जमू लागला. उड्डाणपुलाला बॅनर लावण्याबाबत दोन्ही समाजातील गट ठाम राहिल्याने कोणताही मोठा वाद वाढू नये म्हणून वेळापूर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश बागाव यांनी वरिष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने मोठा पोलीस बंदोबस्त लावला.

हा वाद मिटण्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश बागवा यांनी दोन्ही समाजातील गटांबरोबर याबाबत सविस्तर चर्चा करून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केला पण हा प्रश्न सुटत नसल्याने रात्री उशिरा मध्यरात्रीच्या सुमारास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश बागाव यांनी दोन्ही समाजातील गटांवर वेळापूर पोलीस स्टेशनला वेगवेगळे गुन्हे दाखल केले.

जिल्हा दंडाधिकारी सोलापूर यांच्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करून जर बेकायदेशीरपणे समाज बांधव जमविल्याबद्दल पहिल्या गुन्ह्याची नोंद वेळापूर पोलीस स्टेशनला पोलीस कॉन्स्टेबल सोमनाथ यलमार यांनी केले असून यामध्ये संशयित आरोपी म्हणून एका समाजाच्या १२ महिला व ६० ते ७० अनोळखी पुरुष तर दुसरा गुन्हा पोलीस नाईक नितीन लिंगडे यांनी नोंद केला असून यामध्ये ८० ते ९० जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. याचा अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश बागाव हे करीत आहेत.

पालखी मार्गाच्या पुलांना बेकायदेशीरपणे बॅनर लावण्याचा प्रयत्न करू नये, कोणत्याही वस्तूला बेकायदेशीर फलक लावणे अथवा फोटो लावणे त्याचे नामकरण करणे, बेकायदेशीर आहे. असे आढळल्यास संबधीत व्यक्तीवर महाराष्ट्र विद्रोपीकरण कायद्यानुसार तसेच जिल्हाधिकारी यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्यास गुन्हा दाखल करून त्या व्यक्तीस ३ महीने कारावास अथवा दंड होऊ शकतो. यामुळे उड्डाणपुलाला अथवा इतर ठिकाणी बॅनर लावून नामकरण करणे असे कृत्य करु नये.

– निलेश बागाव (सहाय्यक पोलीस निरीक्षक, वेळापूर)

रमेश बैस महाराष्ट्राचे नवे राज्यपाल

कोश्यारींचा राजीनामा मंजूर

सुराज्य/मुंबई

महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी पदमुक्त होण्याची इच्छा व्यक्त करत आपला राजीनामा दिल्यानंतर रविवार अखेर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी कोश्यारी यांचा राजीनामा मंजूर केला आहे. कोश्यारी यांच्या राजीनाम्याने रिक्त झालेल्या महाराष्ट्राच्या राज्यपालपदी रमेश बैस यांची नियुक्ती करण्यात आली आहे. देशभरातील १३ राज्यांमध्ये रविवार फेरबदल झाले असून झारखंडचे राज्यपाल म्हणून काम पाहणारे रमेश बैस हे लवकरच महाराष्ट्राच्या राज्यपालपदाची धुरा सांभाळणार आहेत.

भगतसिंह कोश्यारी हे महापुरुषांबाबतच्या वक्तव्यांमुळे अनेकदा वादात सापडले होते. त्यामुळे त्यांची राज्यपालपदावरून हकालपट्टी करण्यात

यावी, अशी मागणी महाविकास आघाडीकडून केली जात होती.

राज्यपाल हटवण्याच्या मागणीसाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून काही दिवसांपूर्वी मुंबईत मोठ्या मोर्चाचंही आयोजन करण्यात आलं होतं. परिणामी सत्ताधारी भाजपची चांगलीच राजकीय कोंडी झाली होती. तसंच स्वत: कोश्यारी हेदेखील आपल्याला पदमुक्त करण्यात यावं, अशा भावना व्यक्त करत होते.

या पार्श्वभूमीवर आता राष्ट्रपतींकडून त्रिपुरा आणि झारखंडसारख्या राज्यांच्या राज्यपालपदाची जबाबदारी सांभाळलेल्या अनुभवी रमेश बैस यांची महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

सावित्रीबाई फुले, महात्मा फुले यांच्यासह छत्रपती शिवाजी महाराजांबाबत केलेल्या वक्तव्यातून कोश्यारी यांनी वाद ओढावून घेतला होता. या सगळ्या घडामोडींमुळे भगतसिंह कोश्यारी हे राज्यपालपदाच्या प्रतिष्ठेला धक्का लावत असल्याचा आरोप होत होता.

परिणामी राज्य आणि केंद्रातील सत्ताधारी असलेल्या भाजपचीही राजकीय कोंडी झाली होती. त्यामुळे कोश्यारी यांची गच्छंती अटळ मानली जात होती. आता त्यांच्या जागी राज्यपाल म्हणून नियुक्ती झाल्यानंतर रमेश बैस यांच्यासमोर सत्ताधारी आणि विरोधकांना सोबत घेत राज्याच्या राजकीय गाडा सुरळीत ठेवण्याचं प्रमुख आव्हान असणार आहे.

रमेश बैस यांची कारकीर्द

रमेश बैस यांचा जन्म छत्तीसगड राज्यातील रायपूर येथे झाला आहे. तब्बल सात वेळा खासदार म्हणून निवडून आलेले बैस हे देशाचे माजी पंतप्रधान दिवंगत अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात मंत्री होते. मात्र, २०१९ मध्ये त्यांना लोकसभेचं तिकीट नाकारण्यात आलं. त्यानंतर त्रिपुरा राज्याचे राज्यपाल म्हणून रमेश बैस यांना नियुक्त करण्यात आलं होतं. त्रिपुरात दोन वर्षे राज्यपाल म्हणून काम पाहिल्यानंतर २०२१ मध्ये त्यांची झारखंडच्या राज्यपालपदी नेमणूक करण्यात आली होती. त्यानंतर आता महाराष्ट्राचे राज्यपालपद रिक्त झाल्यानंतर त्यांच्याकडे ही धुरा सोपवण्यात आली आहे.

बैस यांच्यासमोरील आव्हान

महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून भगतसिंह कोश्यारी यांची कारकीर्द प्रचंड वादळी ठरली. महाविकास आघाडीचं सरकार असताना कोश्यारी यांनी तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना उद्देशून लिहिलेल्या वादग्रस्त पत्राचीही मोठी चर्चा झाली होती. तसंच राज्यपाल नियुक्त आमदारांवरून कोश्यारी यांचे महाविकास आघाडीसोबत प्रचंड मतभेद झाल्याचं समोर आलं होतं.

झोमॅटोने २२५ शहरांतून व्यवसाय गुंडाळला

सुराज्य/नवी दिल्ली

फूड डिलिव्हरी करणाऱ्या झोमॅटोने मोठा निर्णय घेतला आहे. लहान शहरांतील व्यवसाय झोमॅटोने गुंडाळला आहे. आतापर्यंत २२५ लहान शहरांतील सेवा झोमॅटोने बंद केली असून कंपनीच्या डिसेंबर तिमाहीच्या कमाईच्या अहवालातून ही बाब समोर आली आहे.

जानेवारी महिन्यांत आम्ही जवळपास २२५ लहान शहरांतून बाहेर पडलो आहोत, असं कंपनीकडून सांगण्यात आलं आहे. या शहरांतून जवळपास एकूण व्यवसायाच्या ०.३ टक्केच व्यवसाय होत होता. एकीकडे झोमॅटोने एक हजार शहरांत व्यवसाय विस्तार केल्यानंतर २२५ लहान शहरांतून कंपनी बाहेर पडली आहे. या शहरांतील नफ्यातून कंपनीच्या नफ्यात फारसा फरक पडत नव्हता असंही कंपनीकडून सांगण्यात आलं आहे.

झोमॅटोच्या ऑक्टोबर-डिसेंबरच्या तिमाहित ७५ टक्क्यांनी महसूल वाढून १९४८ कोटी झाला होता. यामध्ये कंपनीचा तोटा ५ पटीने वाढून ३४६ कोटी रुपये झाला होता. तर, ३१ डिसेंबर रोजी संपलेल्या तीन महिन्यांच्या कालावधीसाठी कंपनीच्या महसुलात ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे. दरम्यान, एकीकडे २२५ शहरांमधून बाहेर पडल्यानंतर झोमॅटोच्या शेअर्समध्येही घसरण झाली. शुक्रवारी सकाळी बीएसईवर कंपनीचा शेअर १.४७ टक्क्यांनी घसरून ५३.६० रुपयांवर आला होता.

फूड डिलिव्हरीसाठी भारतात सर्वाधिक झोमॅटोचा वापर केला जातो. आपल्या कमाईत वाढ होण्याकरता कंपनीने गोल्ड सबस्क्रिप्शन उपलब्ध केले आहे. महत्त्वाचं म्हणजे २२५ शहरातील एक्जिटची माहिती तेव्हा समोर आली आहे जेव्हा या कंपनीने ८०० लोकांची भरती करण्याचा निर्णय घेतला आहे. म्हणजेच तोट्यामुळे या शहरातील व्यवसाय बंद झाला नसून नफा वाढवण्याकरता येथील व्यवसाय गुंडाळला असल्याचं म्हटलं जात आहे.

राज्य सरकारची मोठी घोषणा

पत्रकार वारीशेंच्या कुटुंबाला २५ लाखांची मदत

सुराज्य/रत्नागिरी

राजापूर येथील पत्रकार शशिकांत वारीशे यांचा संशयास्पद मृत्यू झाला आहे. त्यांची हत्या करण्यात आल्याचा आरोप होत आहे. विरोधी पक्षांनी ठाकरे गटाची शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेससह विरोधी पक्षांनी हे प्रकरण उचलून धरले आहे. या प्रकरणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी एसआयटी चौकशीची घोषणा केली. आता वारीशे यांच्या कुटुंबाला सरकारने रविवारी मदतीची मोठी घोषणा केली आहे.

शशिकांत वारीशे यांच्या मृत्यू प्रकरणी संशयित आरोपी पंढरीनाथ आंबेरकर हा पोलीस कोठडीत आहे. या सगळ्या धक्कादायक जीवघेण्या प्रकरणात वारीशे यांचे कुटुंब कोलमडून पडले आहे. त्यांच्या कुटुंबाची व्यथा माध्यमांनी लावून धरत वास्तव जगासमोर आणले. आणि कुटुंबाला मदत करण्याच्या मागणीने जोर धरला. अखेर आज या मागणीला यश आले आहे.

राज्य सरकारने वारीशे यांच्या कुटुंबाला २५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. तर शिक्षण घेत असलेल्या वारीशे यांचा मुलगा यश यालाही कायमस्वरूपी नोकरी घेण्यात येईल, अशी ग्वाही पालकमंत्री तथा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी रत्नागिरीत पत्रकारांशी संवाद साधताना दिली.

राजापूरमधील कशेळी येथील पत्रकार शशिकांत वारीशे यांच्या मृत्यूनंतर त्यांचे कुटुंब उघड्यावर आले आहे. एक मुलगा आणि त्याची आजी यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

या कुटुंबीयांना शासनाकडून मदत मिळावी, अशी मागणी पत्रकार संघटनांनी केली होती. रत्नागिरीतील पत्रकारांनी एकत्र येत ही मागणी उद्योगमंत्री उदय सामंत यांच्याकडे लावून धरली. पत्रकारांच्या या मागणीची दखल घेत मंत्री उदय सामंत यांनी तात्काळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना फोनवरून चर्चा केली.

या चर्चेत मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून १० लाख व इतर माध्यमातून १५ लाख, अशी एकूण २५ लाखाची मदत वारीशे यांच्या कुटुंबीयांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी घोषणा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली आहे. तसेच वारीशे यांच्या मुलाला कायमची नोकरी देण्याचे आश्वासनही यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत यांनी दिले.

अभिव्यक्ती स्वातंत्र्य नष्ट; खरगे यांची टीका

सुराज्य/मुंबई : ''देशात संसदेत असो किंवा बाहेर कुठेही अभिव्यक्ती स्वातंत्र्य नाही. जे मुक्तपणे बोलण्याचे धाडस करतात त्यांना तुरुंगात टाकले जाते. देशात भाषणस्वातंत्र्य उरलेले नाही,'' असा आरोप करून काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केंद्रातील भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकार टीकेचे लक्ष्य केले.

बंजारा समाजाच्या कार्यक्रमात जमावाकडून गोंधळ

सुराज्य/वाशिम

संत श्री सेवालाल महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याच्या अनावरणासाठी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह १५ मंत्री आज पोहरादेवी येथे गेले आहेत. मात्र, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या समक्ष कार्यक्रमात उपस्थित बांधवांनी गोंधळ घातला. कार्यक्रम उशीरा सुरू झाल्याने नाराज झालेल्या उपस्थितीतांनी घरचा रस्ता धरला असताना हा गोंधळ निर्माण झाला.

परिणामी कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये म्हणून खुद्द संजय राठोड यांच्या पत्नी शीतल राठोड यांनी भर गर्दीत जाऊन जमावाला शांत केले. शीतल राठोड यांनी बंजारा समाजाचे पारंपरिक पोषाख परिधान केला होता.

मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांकडून संत श्री सेवालाल महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. तसेच १३५ फूट उंच सेवाध्वजाची स्थापना करण्यात आली. तसेच या भागातील ५९३ कोटींच्या कामांचा शुभारंभही यावेळी करण्यात आला. या कार्यक्रमाला बंजारा समाजातील लोकांनी मोठ्या प्रमाणावर हजेरी लावली होती. मात्र, नियोजित वेळेपेक्षा हा कार्यक्रम उशिराने सुरू झाला. त्यामुळे कार्यक्रमस्थळी पोहोचलेल्या लोकांनी गोंधळ घालायला सुरुवात केली.

१३ राज्यांचे राज्यपाल बदलले

सुराज्य/नवी दिल्ली

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि लडाखचे उपराज्यपाल राधा कृष्णन माथूर यांचे राजीनामे मंजूर केले आहेत. याशिवाय राष्ट्रपतींनी १३ राज्यपाल आणि उपराज्यपालांची नियुक्ती केली आहे.

झारखंडचे राज्यपाल असलेल्या रमेश बैस यांची महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय गुलाबचंद कटारिया यांच्याकडे आसामची, माजी

केंद्रीय मंत्री शिवप्रताप शुक्ला यांच्याकडे हिमाचल प्रदेशची जबाबदारी देण्यात आली आहे.

राष्ट्रपतींकडून नियुक्त करण्यात आलेल्या राज्यपाल आणि उपराज्यपालांची संपूर्ण यादी.

१. लेफ्टनंट जनरल कैवल्य त्रिविक्रम परनाईक, राज्यपाल, अरुणाचल प्रदेश २. लक्ष्मण प्रसाद आचार्य, राज्यपाल, सिक्किम ३. सी. पी. राधाकृष्णनन, राज्यपाल, झारखंड ४. शिवप्रताप शुक्ला, राज्यपाल, हिमाचल प्रदेश ५. गुलाबचंद कटारिया, राज्यपाल, आसाम ६. निवृत्त न्यायमूर्ती एस. अब्दुल नझीर, राज्यपाल, आंध्रप्रदेश ७. बिस्वा भूषण हरिचंदन, राज्यपाल, छत्तीसगढ ८. अनुसुईया उईके, राज्यपाल, मणीपूर ९. एल. गणेशन, राज्यपाल, नागालँड १०. फागू चौहान, राज्यपाल, मेघालय ११. राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर, राज्यपाल, बिहार १२. मेश बैस, राज्यपाल, महाराष्ट्र १३. निवृत्त ब्रिगेडियर बी. डी. मिश्रा, उपराज्यपाल, लडाख.

निष्क्रिय खासदारांना मोदींचा सूचक इशारा

सुराज्य/नवी दिल्ली

मिशन २०२४ साठी भाजपाने जोरदार तयारी केली असून आपआपल्या मतदारसंघात लक्ष घालण्यास सुरुवात केली आहे. त्याच पार्श्वभूमीवर ज्या खासदारांचा अहवाल नकारात्मक आहे, अशा खासदारांची पंतप्रधान नरेंद्र मोदी वैयक्तिक भेट घेऊन मतदारसंघ टिकवण्यासाठी खासदारांची शाळा घेत आहेत. मतदारसंघात जास्त वेळ देऊन लोकांचं म्हणणं ऐकून घेण्याचे निर्देश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संबंधित खासदारांना दिले आहेत.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीला आता काहीच महिने शिल्लक आहेत. त्यामुळे मिशन २०२४ काबीज करायचं असेल तर आतापासून भाजपाने रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, काही राज्य आणि त्यांच्या लोकसभा मतदारसंघातून येणाऱ्या अहवालामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी चिंतेत आहेत. संसदेत सध्या अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्याने या संबंधित खासदारांना बोलावून पंतप्रधानांनी त्यांना मतदारसंघ टिकवण्याचे धडे दिले आहेत.

२० फेब्रुवारीपासून सर्व महाविद्यालये बंद

सुराज्य/नवी दिल्ली

राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्न महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी दि. २० फेब्रुवारीपासून बेमुदत काम बंद आंदोलन करतील, अशी माहिती अखिल भारतीय विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष डॉ. आर. बी. सिंह यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिली.

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठ व संलग्न महाविद्यालय सेवक संयुक्त कृती समितीच्यावतीने राज्य शासनाकडे प्रलंबित ६ मागण्यासाठी राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे २ फेब्रुवारीपासून बारावी बोर्ड व विद्यापीठ परीक्षावरील बहिष्कार आंदोलन सुरू आहे. त्यानिमित्त कृती समितीचे पदाधिकारी दौऱ्यावर आहेत. ते सोलापुरात पत्रकारांशी बोलत होते.

ते पुढे म्हणाले, 'विद्यार्थ्यांचे हित पाहून आम्ही दोन वेळा हा संप स्थगित केला आहे. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी आमच्याशी एक फेब्रुवारी रोजी चर्चा केली. परंतु या बैठकीत ठोस निर्णय न झाल्यामुळे आम्ही हा संप पुढे चालू ठेवला आहे, असे महासंघाचे अध्यक्ष डॉ. आर. बी. सिंह यांनी स्पष्ट केले.

हे आहेत आंदोलनाचे टप्पे

१४ फेब्रुवारी रोजी दुपारी २.०० ते २.३० अवकाश काळात निदर्शने, १५ फेब्रुवारी रोजी काळ्या फिती लावून कार्यालयीन काम करणे, १६ फेब्रुवारी रोजी एक दिवसाचा लाक्षणिक संप, २० फेब्रुवारीपासून सर्व अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये बेमुदत बंद करण्यात येणार आहेत.

नाणेनिधीच्या अटीमुळे पाकमध्ये विजेवर नवा कर

सुराज्य/कराची

गंभीर आर्थिक संकटाशी झुंज देणाऱ्या पाकिस्तानला अर्थसाह्य मिळवण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची कर सुधारणेची अट मान्य करावी लागली आहे. त्यानुसार आता कृषी पंपांसह सर्वच वीजग्राहकांवर नवीन कर लादण्यात आला आहे.

पाकिस्तानचे अर्थमंत्री इशाक दर यांनी यासंबंधी माहिती दिली. विजेच्या प्रति युनिट दरांमध्ये मोठी वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामधून १७ हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त महसूल जमा होणे अपेक्षित आहे.

राज्यात १२ नवीन जिल्हा रुग्णालये उभारणार

सुराज्य/मुंबई : कर्करोग व मूत्रपिंड विकारासह वेगवेगळ्या आजारांचे वाढते रुग्ण लक्षात घेऊन अनेक नवीन योजना राबविण्यावर भर देतानाच आरोग्यसेवेचा पध्दतशीरपणे विस्तार करण्याचा निर्णय आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांनी घेतला आहे.

यासाठी राज्यात नवीन १२ जिल्हा रुग्णालये स्थापन करण्याची महत्त्वाकांक्षी योजना तयार करण्यात आल्याचे आरोग्य विभागाच्या उच्चपदस्थांनी सांगितले. आजघडीला राज्यात आरोग्य विभागाच्या अखत्यारित कागदावर २३ जिल्हा रुग्णालये आहेत. तथापि गेल्या काही वर्षात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी आरोग्य विभागाच्या तब्बल १८ जिल्हा रुग्णालयांचे वैद्यकीय शिक्षण विभागाकडे हस्तांतरण करण्यात आले आहेत.

सुराज्य/मुंबई

लिंग बदलासाठी मुंबई हायकोर्टात गेलेल्या महिला पोलीस कॉन्स्टेबलला कुठलाही दिलासा मिळाला नाही. आधी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण म्हणजेच (MAT) कडे दाद मागावी, अशी सूचना हायकोर्टाने महिला पोलिसाला केली आहे.

नांदेडच्या महिला पोलिसाला व्हायचंय पुरुष

नांदेडची महिला पोलीस कॉन्स्टेबल वर्षा उर्फ विजय पवार (वय-३६) यांनी मुंबई हायकोर्टात लिंग बदलासाठी याचिका केली आहे. आपल्याला शस्त्रक्रिया करून पुरुष व्हायचं आहे. यासाठी एक महिन्याची रजा हवी आहे. या लिंग बदल शस्त्रक्रियेचा खर्चही राज्य सरकारने करावा, अशी मागणी महिला पोलीस नाईक वर्षा पवार यांनी केली आहे. पवार यांच्या याचिका १ फेब्रुवारीला सुनावणी झाली.

वडिलांच्या निधनानंतर पवार या एप्रिल २००५ मध्ये अनुकंपा तत्वावर पोलिसात भरती झाल्या होत्या. मे २०१२ मध्ये त्या पोलीस नाईक झाल्या. 'आपण आपल्या बहिणीसारखी एक स्त्री म्हणून दिसत असलो तरी मनात कायमच पुरुषी भावना येत होत्या', असं त्यांनी याचिकेत म्हटलं आहे. डिसेंबर २०१८ मध्ये केलेल्या चाचणीत आपण पुरुष असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. सेंट जॉर्ज हॉस्पिटलनेही चाचणीचे रिपोर्ट बरोबर असल्याचं म्हटलं आहे. तसेच लिंग बदल शस्त्रक्रिया करून घेण्याचा सल्ला दिला आहे.

एप्रिल २०२१ मध्ये दिल्लीतील हॉस्पिटलनेही त्या मानसिकदृष्ट्या तंदुरुस्त असल्याचं म्हटलं आहे. समस्या सोडवण्यासाठी पवार यांनी आपली व्यथा वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोर मांडली. पण कुणीही त्यांच्या मागणीची आणि विनंतीची दखल घेतली नाही. यामुळे ऑगस्ट २०२२ मध्ये नांदेडच्या पोलीस अधीक्षकांना पत्र लिहून त्यांनी विनंती केली. यानंतर ७ डिसेंबर २०२२ मध्ये त्यांनी राज्याच्या पोलीस महासंचालकांना पत्र लिहिलं. लिंग बदल शस्त्रक्रियेसाठी परवानगी देण्याची नियमात तरतूद नसल्यामुळे मार्गदर्शन करावं, असं त्यांनी पत्रात म्हटलं. त्यानंतर पोलीस

महासंचालनालयाने नकार दिल्याचं २ जानेवारी २०२३ ला नांदेडच्या पोलीस अधीक्षकांनी त्यांना तोंडी माहिती दिली.

अखेर पवार यांनी हायकोर्टात धाव घेतली. वकील एजाज नक्की यांच्यामार्फत पवार यांनी हायकोर्टात याचिका केली. शारीरिक बदल हा नैसर्गिक आहे आणि मानसिकदृष्ट्या त्या पुरुषी आहेत. यामुळे इच्छेनुसार जीवन जगण्याचा त्यांचा मूलभूत हक्क आहे, असं याचिकेत म्हटलं आहे.

नागरिकांच्या लैंगिक समस्या आणि लिंग ओळखीबाबत राज्य सरकारडे योग्य धोरण नाही. तसंच आपलं लिंग बदल शस्त्रक्रिया करून आपलं नाव बदलून विजय पवार असं नाव करण्याची परवानगी द्या, अशी विनंतीही याचिकेतून करण्यात आली आहे.

या प्रकरणी १ फेब्रुवारीला हायकोर्टात सुनावणी झाली. यावेळी राज्य सरकारच्या वकील ज्योती चव्हाण याचिकेवर आक्षेप घेतला. पवार यांच्याकडे 'मॅट'कडे दाद मागण्याचा पर्याय आहे, असं राज्य सरकारच्या वकील चव्हाण म्हणाल्या. यानंतर हायकोर्टाने याचिका निकाली काढली. तसंच याचिकाकर्त्या पवार या 'मॅट'कडे जाण्यास स्वतंत्र असल्याचं हायकोर्टाने स्पष्ट केलं.

विषय 'दिल्ली'चा; गोंधळ 'गल्ली'चा



अजित उंब्रजकर

चर्चा पुढील वर्षी होणाऱ्या निवडणुकीची. निवडणूक लोकसभेची. त्यावेळी युती होणार की आघाडी? हे ठरणार दिल्लीतून. जागा वाटप आणि तिकिट वाटपही होणार दिल्लीतूनच. त्यासंदर्भातील कोणताही निर्णय हा ज्या –त्या मतदारसंघात कधीच होतच नसतो. असे असतानाही सोलापूर लोकसभा मतदारसंघाची आगामी निवडणूक कोणी लढवायची? यावरून गदारोळ माजला आहे. ही जागा आहे, काँग्रेसच्या ताब्यात. ती काँग्रेसकडेच राहणार, असे काँग्रेसच्या स्थानिकांचे म्हणणे आहे. दुसरीकडे ही जागा दोनवेळा काँग्रेसने हरली. आता ती जागा राष्ट्रवादी लढवणार; असा हेका राष्ट्रवादीच्या स्थानिकांनी धरला तर तुम्ही सोलापूरची जागा मागितली तर आम्ही बारामतीची जागा मागणार, असा प्रति हेका काँग्रेसवाल्यांनी धरला. ही पतंगबाजी करणाऱ्या स्थानिकांच्या हातात काहीच नाही. कारण हा विषय दिल्लीचा आहे. गोंधळ मात्र गल्लीतील लोक घालत आहेत. त्यावरून सोलापूरकरांची मात्र मस्त करमणूक झाली.

सोलापूरचे माजी महापौर आरिफ शेख यांनी चेष्टेत सुधीर खराटमल यांना भावी खासदार असे संबोधले आणि त्यावरून या वादाची सुरुवात झाली. त्यात कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी सोलापूरची जागा राष्ट्रवादी चांगल्या पद्धतीने लढू शकते, असे वक्तव्य करत त्याला चांगलीच फोडणी घातली आणि या वक्तव्यावरून पुन्हा रामायण झाले. यामध्ये आमदार प्रणिती शिंदे यांनीही सहभाग नोंदवला तर दुसरीकडे सुरुवात केलेल्या रोहित पवार यांनीच आवरते घेत या प्रकरणाचा शेवट केला.

आमदार रोहित पवार यांचे सोलापूरचे दौरे काँग्रेसवाल्यांना तसे खूपत होते. अशातच रोहित पवार यांनी सोलापूर लोकसभेवर अस्पष्ट का होईना मात्र दावा बोलून दाखवला. ही गोष्ट काँग्रेसवाल्याच्या आणखीनच जीवारी लागली. त्यामुळे काँग्रेसच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी याला काय उत्तर द्यायचे याची शहानिशा करून शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी थेट बारामती वर दावा केला. वास्तविक पाहता चेतन नरोटे यांना महापालिकेचे तिकीट देतानाही आमदार प्रणिती शिंदे तसेच माजी गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या पुढे जाता येणार नाही हे वास्तव आह. मात्र असे असतानाही त्यांनी थेट दिल्लीचा विषय गल्लीत आणला आणि पवार यांच्या बारामती मतदारसंघावर दावा ठोकला. यानंतर आमदार रोहित पवार सोलापूर दौऱ्यावर आले त्यांना पत्रकारांनी सोलापूर लोकसभेच्या जागेबद्दल विचारले. वास्तविक पाहता रोहित पवार आमदार असले तरीही सोलापूर लोकसभेच्या जागेचा विषय दिल्लीत होतो हे त्यांना माहिती असतानाही जाणीवपूर्वक त्यांनी गल्लीत विषय आणत दोन वेळा या जागेवर काँग्रेसचा पराभव झाला आहे. राष्ट्रवादीला जर ही जागा दिली तर आम्ही चांगल्या पद्धतीने लढू, असे असे सांगत काँग्रेसच्या वर्मावर घाव घातला आणि येथूनच खऱ्या महाभारताला सुरुवात झाली. रोहित पवार यांच्या या वक्तव्यानंतर शहराध्यक्ष चेतन नरोटे, अंबादास करगुळे, विनोद भोसले, काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष सु. रे श हसापुरे यांनीही या वादात उडी घेत बारामती मतदारसंघावर दावा केला तसेच गल्लीतील कार्यकर्त्यांनी ही कर्जत जामखेडची जागा काँग्रेसकडे घ्यावी, असे पत्र चक्क प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना पाठवले.

ऐकावे नेत्याचे, करावे मनाचे

संपूर्ण प्रकरणात दोन्ही काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी ऐकावे नेत्याचे आणि करावे मनाचे हे जरी लक्षात ठेवले असते तर असे हसू झाले नसते. कारण कितीही केले तरी नेते एकमेकांचे शत्रू कधीच नसतात शत्रू होतात ते कार्यकर्ते आणि पदाधिकारीच.

या प्रकरणानंतर एखादा दिवस शांत जातो न जातो तोच एका पत्रकार परिषदेला आलेले माजी महापौर महेश कोठे यांनी चेतन नरोटे यांना धारेवर धरले. बारामती मागणी म्हणजे राष्ट्रवादीला डिवचणे आणि पर्यायाने माजी गृहमंत्री सुशील कुमार शिंदे यांच्या अडचणीत वाढ करणे असे वक्तव्य केले. मात्र याच दिवशी नेमक्या आमदार प्रणिती शिंदे सोलापुरात होत्या. महेश कोठे यांनी सुशीलकुमार शिंदे अडचणीत येतील असे वक्तव्य केल्याचे कोण जाणे आमदार प्रणिती शिंदे यांना एका कार्यक्रमात दरम्यानच कळले आणि दुसऱ्या दिवशी सर्वत्र महेश कोठे यांची हेडलाईन होईल या विचाराने आमदार प्रणिती शिंदे यांनी कोण रोहित पवार? त्यांची पहिली टर्म आहे, एक दोन टर्म नंतर त्यांना मॅच्युरिटी येईल, असे बिनधास्त आणि बेधडक वक्तव्य केले. वास्तविक पाहता राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आदल्या रात्रीच त्यांच्या जनवासल्या या निवासस्थानी होते. त्यांनी यावेळी माजी मंत्री सुशीलकुमार शिंदे यांची ही भेट घेतली होती, असे असतानाही आमदार प्रणिती शिंदे यांचे कोण रोहित पवार हे वक्तव्य चांगलेच धाडसी असल्याची चर्चा संपूर्ण राजकीय वर्तुळात झाली. पूर्ण दिवसभर सोलापूर शहर जिल्ह्यात आमदार प्रणिती शिंदे यांचीच हेडलाईन गाजली. आमदार प्रणिती शिंदे यांच्या या वक्तव्यानंतर मात्र राष्ट्रवादी काँग्रेस मात्र पुरतीच बिथरली आणि प्रशांत बाबर, जुबेर बागवान यांच्यासह अनेक लहान–मोठे कार्यकर्ते थेट काँग्रेस बरोबर येऊन धडकले आणि किचन कल्लाकार मधील रोहित पवार आणि आमदार प्रणिती शिंदे यांचे बॅनर काँग्रेस भवनवर लटकवले. यानंतर काँग्रेस कार्यकर्त्यांचा रागही अनावर झाला. अंबादास करगुळे, विनोद भोसले, महेश लोंढे या पदाधिकाऱ्यांनी आमदार प्रणिती शिंदे यांचे बॅनर राष्ट्रवादीच्या कार्यालयावर लावत आता कसे वाटतेय– गोड गोड वाटतेय असे बोलत राष्ट्रवादीला खिजवले. हे प्रकरण जास्तच तापत असल्याची जाणीव आमदार रोहित पवार यांना झाली आणि त्यांनी ट्विट करत आमदार प्रणिती शिंदे या मोठ्या भगिनी आहेत, असे सांगत या वादावर पडदा टाकला. त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनाही बेरोजगारीचा मुद्दा आठवला आणि दोन्ही काँग्रेसमधील वाद मिटवण्याचे आवाहन पदाधिकाऱ्यांना केले. आदल्या दिवशी जे एकमेकांचे पोस्टर लावून गोंधळ घालत होते त्यांचे हात दुसऱ्या दिवशी एकमेकांच्या हातात दिसून आले. वास्तविक पाहता लोकसभा कोण लढवायची हा विषय दिल्लीत होतो मात्र तो विषय गल्लीत आणून दोन्ही काँग्रेसने आणि त्यांच्या पदाधिकाऱ्यांनी स्वतःचे हसू करून घेतले. या संपूर्ण प्रकरणात बिचाऱ्या प्रशांत बाबर यांचे मात्र नुकसान झाले. त्यांना मात्र आपल्या पदाला मुकावे लागले.

सांगता येईना, धड बोलताही येईना

नासिर तांबोळी

सांगोला नगरपालिका निवडणुकीची मुदत संपून १४ महिने संपत आले तर जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीची मुदत संपून येत्या मार्चमध्ये १ वर्ष पूर्ण होत आहे. परंतू अद्याप निवडणुकी संदर्भात कोणतीही घोषणा व निर्णय होत नसल्याने भावी नगरसेवक व जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांची चांगलीच कोंडी झाली आहे.

दिवसेंदिवस मुदतवाढ मिळत असल्याने मतदारांना राम राम ठोकून भावी उमेदवारांची चांगलीच दमछाक होत आहे. यामुळे भावी उमेदवारांचं दुखणं धड सांगताही येईना आणि ना बोलताही येईना असेच झाले आहे.

सांगोला नगरपालिका निवडणुक कालावधी संपल्यामुळे पालिका प्रशासनाचा कारभार हा प्रशासकावर सुरू ठेवण्याचा निर्णय झाला. यामुळे पूर्वीच निवडणुक लांबणीवर पडली असताना, महाविकास आघाडीच्या सरकारच्या काळात निवडणुकीसाठी नव्याने प्रभाग रचना जाहीर करण्यात आल्या.

प्रभाग रचना जाहीर झाल्यानंतर भावी नगरसेवक यांनी आपापल्या परीने मतदारांची प्रभाग निहाय जुळवाजुळवी नुकतीच सुरू केली होती. तोपर्यंत सरकारमध्ये बदल झाला आणि महाविकास आघाडीच्या काळात घेतलेले निर्णय व प्रभाग रचनेचे कामकाज यावर स्थगिती आल्याची माहिती आहे. तब्बल १४ महिने संपत आले परंतु पुन्हा नगरपालिका निवडणुकीसाठी कोणताही निर्णय अथवा घोषणा होत नसल्याने सांगोला नगरपालिकेचे भावी नगराध्यक्ष व नगरसेवक यांच्याकडून मतदारांचा सन्मान आणि मान राखण्यात अजून किती दिवस जाणार असे असाच काहीसा सूर आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी येत्या मार्चमध्ये निवडणूक कालावधी संपून एक वर्ष पूर्ण होत आहेत. यामुळे भावी जिल्हा परिषद सदस्य व पंचायत समिती सदस्य यांच्याकडून गट व गणातील मतदारांना रामराम ठोकण्यात दिवस चालले आहेत. परंतु निवडणुका जाहीर होत नाहीत असे ऐकण्यास मिळत आहे. गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेले उमेदवार आज नमस्ते आणि राम राम एवढ्या पुरतेच मर्यादित राहिलेत का? अशाही गमतीच्या गप्पा गावागावात सुरू असून, निवडणूक आयोग कोणत्याही क्षणी निवडणुका जाहीर करणार असल्याचे बोलले जात असले तरी सध्या भावी उमेदवार यांची मोठी दमछाक होत आहे.

माजी मंत्र्यांकडे पाठ, आजी मंत्र्यांकडे लाट

दीपक शेळके

एकच विचार धारा, एकाच पक्षाचे एकेकाळचे शिलेदार, त्यात एक अधिक अनुभवी, एक त्या तुलनेत नवखे मात्र सत्तेची चक्रे जशी फिरतात, तसा कार्यकर्त्यांचा मेळा देखील बदलत जातो. त्याची प्रचिती सोलापूरच्या शासकीय विश्रामगृहात शनिवारी आजी –माजी उद्योग मंत्र्यांच्या सोलापूर दौऱ्याच्या वेळी पाहवयास मिळाली. माजी आणि जेष्ठमंत्र्यांकडे कार्यकर्त्यांनी पाठ फिरवली तर आजी उद्योगमंत्र्यांकडे कार्यकर्त्यांची लाट दिसून आली.

राज्यातील शिंदे– फडणवीस सरकार मधील उद्योग मंत्री उदय सामंत सोलापूर दौऱ्यावर आले होते. त्यांनी सोलापूरच्या शासकीय विश्रामगृहात शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची लाट दिसून आली. त्यावेळी त्यांच्या दालनात शिवसेनेचे जेष्ठ आणि अनभुवी असलेले आणि महाविकास आघाडीमध्ये उद्योग मंत्री असलेले सुभाष देसाई यांचा मुक्काम होता. मात्र, सत्ता आणि खुर्ची गेली की, पाखरे देखील उडून जातात,अशी खंत तत्कालिन फडणवीस सरकारमधील माजी कृषी राज्यमंत्री सदाभाऊ खोत यांनी व्यक्त केली होती तेच चित्र शनिवारी आजी– माजी उद्योगमंत्र्यांच्या दालनात दिसून आली.

वास्तविक पाहता आजी उद्योग मंत्री उदय सामंत आणि माजी उद्योग मंत्री सुभाष देसाई हे एकाच पक्षाचे शिलेदार होते. शिवसेना आणि स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्यावर निष्ठा ठेऊन एकाच विचारधारेवर चालणारे. मात्र भाजपाने शिवसेनेमध्ये उभी फूट पाडली. एक एक करत तब्बल चाळीस आमदार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मागे गेले. परिणामी राज्यातील महाविकास आघाडीचे सरकार गडगडले आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मुख्यमंत्री तर देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री झाले. या शिंदे– फडणवीस सरकार मध्ये उदय सामंत यांना उद्योगमंत्री पदाची लाटरी लागली. माढा तालुक्यातील वाकाव येथे आयोजित राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेच्या निमित्ताने सामंत सोलापूर जिल्हाच्या दौऱ्यावर आले होते. त्यांनी बाळासाहेबांची शिवसेना गटाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक घेतली. यावेळी आजी–माजी शिवसैनिकांनी सामंत यांना भेटण्यासाठी रिघ लावली होती. त्याच वेळी शेजारील दालनामध्ये महाविकास आघाडीमध्ये उद्योगमंत्री असलेले उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे माजी सुभाष देसाई हे देखील सोलापूर दौऱ्यावर होते. सांगोला येथील गट शेती पाहण्यासाठी देसाई आले होते. माजी मंत्र्यांसोबत कार्यकर्ते नव्हते. एक माजी नगरसेवक वगळता देसाई यांच्या दौऱ्याची ठाकरे गटाच्या एकाही पदाधिकाऱ्याला कल्पना देखील नव्हती. मंत्रीपद, खुर्ची आणि सत्ता गेली की– सर्व डामडोल जातो आणि जवळ असणारी माणसे देखील उडून जात असतात हे वास्तव पहायला मिळाले.

अभिजीत पाटील यांच्या विरुद्ध माढा- पंढरपूरचे विरोधक एकत्र

सूरज सरवदे

विठ्ठल सहकारी साखर कारखान्यावर एक हाती सत्ता संपादन केल्यानंतर अभिजीत पाटील यांच्या नेतृत्वाची चर्चा पंढरपूर मंगळवेढा आणि माढा विधानसभा मतदारसंघात होत आहे. त्यामुळे पंढरपूर आणि माढा मतदारसंघातील विरोधक वसंतराव काळे यांच्या जयंतीनिमित्त शेतकरी मेळाव्यानिमित्त एकत्र आले होते. विरोधकांनी अभिजित पाटील यांची धास्ती घेतल्याचे पाहायला मिळत आहे.

कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचा ऊस तोडणी मुकादम व्हाया पाच कारखान्यांचे चेअरमन ते विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन असा प्रवास करणारे पाटील यांची धास्ती विरोधकांनी घेतली आहे.

पाटील यांनी पंढरपूर तालुक्यांमध्ये स्वतंत्र गट निर्माण केला आहे. विठ्ठल कारखान्याच्या यशानंतर आणि स्व. भारत नाना भालके यांच्या निधनानंतर पंढरपूर तालुक्यात निर्माण झालेली पोकळी त्यांनी भरून काढली आहे. धाडसी, कणखर नेतृत्व पंढरपूर तालुक्याला मिळाले आहे. जनतेचा विश्वास संपादन करण्यात ते यशस्वी झाले आहेत. पंढरपूर, सांगोला, उस्मानाबाद, नांदेड, बीड आणि नाशिक जिल्ह्यामध्ये साखर कारखानदारीच्या माध्यमातून पाटलांचा शेतकऱ्यांशी संपर्क येतो. पाटील यांचा फायदा पाच जिल्ह्यांमध्ये होत असल्यामुळे कोणताही पक्ष त्यांना विधानसभेची उमेदवारी देवू शकतो. पाटील यांचे भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षातील नेत्यांची घनिष्ठ संबंध आहेत. येणाऱ्या २०२४च्या विधानसभा निवडणुकीसाठी ते पंढरपूर मंगळवेढा किंवा माढा मतदार संघातून निवडणूक लढवतील याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळे आमदार बबनदादा शिंदे यांच्यापासून माजी आमदार प्रशांत परिचारक, भगीरथ भालके, कल्याणराव काळे यांनी त्यांचा धसका घेतला आहे. पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातून पाटील यांना राष्ट्रवादीची उमेदवारी मिळू शकते तर माढा विधानसभा मतदारसंघातून त्यांना राष्ट्रवादी आणि भाजप या दोन्ही पक्षाकडून उमेदवारी मिळू शकते. त्यामुळे या दोन्ही मतदारसंघातील त्यांचे विरोधक आता एकत्र व्हायला सुरुवात झाली आहे.

विठ्ठल परिवाराचे नेते, पॅनल प्रमुख कल्याणराव काळे, कारखान्याचे माजी चेअरमन भगीरथ भालके, विठ्ठलचे माजी संचालक युवराज दादा पाटील, माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनदादा शिंदे वसंतराव काळे यांच्या जयंतीनिमित्त एकत्र आले होते. कल्याणराव काळे यांच्या शेतकरी मेळाव्यास आमदार बबनदादा शिंदे यांची उपस्थिती सर्व काही सांगून जाते. माढा लोकसभा मतदारसंघासह (पंढरपूर आणि सांगोला तालुका), उस्मानाबाद, नांदेड, बीड आणि नाशिक येथील मतदार संघावर प्रभाव असणारे पाटील यांच्या विरोधात विरोधक एकत्र येताना दिसत आहेत.

आंधळकरांचे राजकीय पुर्नरुज्जीवन होणार का?

सचिन अपसिंगकर

माजी पोलीस निरीक्षक भाऊसाहेब आंधळकर यांच्या राजकीय कारकिर्दीला आता जवळपास एक तप पूर्ण होत आहे. तालुक्यात आंधळकर हे नाव घरोघरी पोहोचले आहे. पण त्या मानाने त्यांना अपेक्षित राजकीय यशाची गोळा बेरीज करता आलेली नाही. आंधळकरांनी बार्शी तालुक्याच्या राजकारणात प्रवेश केला, तेंव्हा मोठे राजकीय वादळ निर्माण झाल्याची वातावरण निर्मिती झाली होती. शिवसेना पक्ष प्रमुख उध्दव ठाकरे यांच्या उपस्थितीमध्ये राजकीय एंन्ट्री केली. आता आंधळकरांनी शिवसेनेला रामराम करून शिंदे गटाची कास धरली आहे. आता शिंदे गटाच्या माध्यमातून आंधळकरांचे राजकीय पुर्नरूज्जीवन होणार का? याची चर्चा तालुक्यात सुरू झाली आहे.

माजी मंत्री दिलीप सोपल हे सध्या शिवसेनेच्या ठाकरे गटात आहेत. राज्याच्या राजकारणात सत्तांतर झाले व शिंदेशाही सरकार आले. मात्र बार्शीमध्ये शिवसेनेचा वेगळा सावता सुभा निर्माण झाला नव्हता. मात्र, आंधळकरांनी शिंदे गटाचे बार्शीत बस्तान बसविण्याचा प्रयत्न केला आहे. या निमित्ताने आंधळकरांचे राजकीय पुर्नरूज्जीवन होणार का? याची चर्चा सुरू झाली आहे.

आंधळकरांनी शिवसेनेचे काम निष्ठेने केले होते पण त्यांना राजकारणात आपल्या पाठीमागे मोठा गॉडफादर तयार करता आला नाही. आता आंधळकरांनी आतापर्यंत केलेल्या राजकारणाचे मुल्यमापन शिंदे गट करणार का हा प्रश्न आहे. तालुक्यातील महत्वाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर आहेत. या पार्श्वभूमीवर तालुक्यात शिंदे गटाला आपले पाय रोवायचे असतील तर आंधळकरांना मोठी रसद पुरवावी लागेल. बार्शी राजकारणात मनगटशाही आणि धनशक्तीचा मोठा बोलबाला आहे. प्रस्थापितांच्या विरोधात राजकारण निर्माण करणे सोपे काम नाही. आंधळकरांनी मोठा राजकीय संघर्ष केला. त्यांनी अतिशय कडवी झुंज दिली मात्र, त्यांना राजकारणात अतिशय मोठ्या अडथळ्यांना तोंड द्यावे लागले आहे. तालुक्याच्या राजकारणात राऊत, सोपल यांच्यात गेली ३० वर्षे चुरशीचा सामना रंगतो आहे. तिसरी शक्ती निर्माण होते मात्र त्या शक्तीचा राजकीय कपाळमोक्ष होतो, असा अनुभव आहे. अशा परिस्थितीमध्ये मुख्यमंत्री शिंदे यांचा विश्वास संपादन करून बार्शी तालुक्याच्या राजकारणात आंधळकरांना आपले स्थान निर्माण करावे लागणार आहे.

नुकतेच त्यांनी विद्यमान आमदार राऊत यांच्या विरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करून त्यांच्या मालमत्तेच्या लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडून चौकशीचे आदेश मिळवले आहेत. पण त्याच वेळेला त्यांना त्यांच्या अधिपत्याखालील खडी, क्रशरच्या थकबाकी बाबतच्या कारवाईलाही तोंड द्यावे लागले आहे.

मोठ्या राजकीय शक्तींबरोबर दंड थोपटण्याचे आव्हान

राजकारणात मुत्सद्दीपणा आणि राजकीय कौशल्यच लागते आणि आंधळकर नेमके राजकीय व्युहरचनांमध्ये कमी पडले आहेत. त्यामुळे त्यांना कायम यशाने हुलकावणी दिली आहे. आंधळकरांना तालुक्यात मोठ्या राजकीय शक्तींबरोबर दंड थोपटायचे आहेत. तालुक्याचे राजकारण म्हणजे अतितटीचा संघर्ष हे वास्तव आहे. अशा परिस्थितीमध्ये तावून सुलाखून जनशक्ती पाठीमागे उभी करण्याचे आव्हान आंधळकरांसमोर आहे आणि ते हे आव्हान कसे पेलणार याकडे तालुकावासियांचे लक्ष आहे.